Chapter-1

-: आधुनिक मराठी वाड्‌मयातील :-

-: आत्मचरित्राचें समीक्षण. :-

प्रकरण पहिलें — प्रास्ताविक

प्रस्तुत प्रबंधाचा विषय

आत्मचरित्र हा वाड्‌मयाचा मोठा विलोभनीय असा प्रकार आहे. पाश्चिमात्य वाड्‌मयात आत्मचरित्र लिहून लाखांनी पैसे मिळविणारे लेखक आहेत. म्हणजे आत्मचरित्राची महती आणि गोडी वाचकांना किती वाटते हें यावरून दिसून येतें. याचें कारण असें की आत्मचरित्रकाराचें अंतरंग दर्शन आपणास व्हावें अशी वाचकांची स्वाभाविक इच्छा असते. कारण प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात अनेक समस्या असतात आणि लहानमोठे अनेक प्रश्न उद्‌भवतात. त्या सर्व समस्यांची समाधानकारक उत्तरें आपणाला मिळत नाहींत. तसेंच जीवनातील सर्व प्रश्नांचीं कोडींही सुटत नाहींत. अशावेळी आत्मचरित्राच्या वाचनाने त्या व्यक्तीचें जीवन अगदी जवळून पाहण्याचा प्रसंग प्राप्त झालेला असतो. कारण आत्मचरित्र म्हणजे स्वतःच लिहिलेलें स्वतःच्या जीवनाचें चित्र होय. या कारणामुळे उत्कृष्ट आत्मचरित्रें जगांतील सर्व भाषांतून लोकप्रिय झालीं आहेत.

तशातच आत्मचरित्र लिहिणारी व्यक्ति राजकारणात, सामाजिक सुधारणेंत, संशोधन करण्यात, प्रवास करण्यात, क्रिकेट सारख्या एखाद्या खेळांत, किंवा गायन, वादन, नृत्य, शिल्प, अशा एखाद्या कलेंत असामान्य प्रविण असेल तर सामान्य लोक त्या आत्मचरित्राकडे अधिकच आकृष्ट होतात. अशात,हेंने वेगवेगळ्या क्षेत्रात कीर्ति संपादन केलेल्या कितीतरी पाश्चिमात्य व्यक्तींनी आपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत. त्या पैकी काही आत्मचरित्रें वाचीत असतांना आपण एखादी

कादंबरी तर वाचीत नाही ना असा आपणास भास होतो, इतकी ती हृद्य आहेत. कारण त्या आत्मचरित्रातील भाषा, प्रसंगाची मांडणी, निवेदनाची सुलभता आणि मुख्य म्हणजे एकामागून एक घटना सांगतांना सत्याचा केलेला पाठपुरावा, या मुळे ती आत्मचरित्रे वाङ्मयातील बहुमोल लेणी झालेली आहेत.

आपल्या मराठी भाषेतही अर्वाचीन काळांत नाना फडणवीस यांच्या अपुऱ्या आत्मचरित्रापासून तों कै. चिंतामण गणेश कोल्हटकर यांच्या मध्यवर्ति सरकार तर्फे उत्कृष्ट ग्रंथ म्हणून पांच हजार रुपयांचे पारितोषक मिळालेल्या ' बहुरूपी ' या आत्मचरित्रापर्यंत अनेक आत्मचरित्रें लिहिलीं गेलीं आहेत. या सर्व आत्म चरित्रांचें समीक्षण एखाद्या स्वतंत्र ग्रंथांत होणें आवश्यक आहे. कारण त्या शिवाय अमुक एक आत्मचरित्र उत्कृष्ट कां आहे आणि अमुक एक निकृष्ट कसें आहे याचीं उदाहरणें वाचकांना वाचायला मिळणार नाहीत.

आत्मचरित्राविषयी थोडीफार साधक बाधक चर्चा करणारें पुस्तक प्रो. अ. म. जोशी आणि डॉ. प्र. व. माचवे यांनी ' चरित्र आत्मचरित्र आणि टीका ' या नांवाने अठरा वर्षांपूर्वी प्रकाशित केलें. त्या पुस्तकाची मर्यादा लक्षांत घेऊन लेखक द्वयांनी आत्मचरित्राबाबत मांडलेला दृष्टीकोन सर्वमान्य होण्यासारखा आहे. परंतु आत्मचरित्राचा सविस्तर इतिहास, उत्कृष्ट आत्मचरित्राची सखोल अशी छाननी, टाकाऊ आत्मचरित्राची निकृष्टता दाखविणारे नियम आणि त्या दाखल दिलेले पुरावे, आत्मचरित्रांतून अवलोकन होणारी राजकीय आणि सामाजिक माहिती, अनेक आत्मचरित्रकारांनी नमूद करून ठेवलेलें त्यांच्या अनुभवांचें सार किंवा ' माझें जीवन विषयक तत्वज्ञान, ' काहींनी देवावर ठेवलेला विश्वास तर काहींचा देवावरही नसलेला भरंवसा असे एक ना दोन हजारो प्रसंग आत्मचरित्रांतून असे आलेले आहेत की त्यावर सविस्तर चर्चा होणें आवश्यक आहे. म्हणूनच आधुनिक मराठी वाङ्मयातील आत्मचरित्रांचें समीक्षण करण्याचें या प्रबंधात ठरविलें आहे. यामुळे आत्मचरित्राचें संपूर्ण आकलन होण्यास आणि आत्मचरित्र वाङ्मयाची वाढ होण्यास थोडीफार मदत होईल असें मला वाटतें.

या प्रबंधांत अर्थातच जीं आत्मचरित्रें पुस्तकरूपानें प्रकाशित झालीं त्यांचाच विचार केलेला आहे. लेखरूपानें वर्तमानपत्रांतून किंवा मासिकांतून जीं आत्मचरित्रात्मक वर्णनें आलीं असतील त्यांचा अंतर्भाव या ठिकाणीं केलेला नाही, हें सांगायला नकोच.

* * *

२

आधुनिक मराठी वाङ्मयाचा उदःकाल

आता येथे मराठी भाषेच्या उत्पत्तीबद्दल अगदी थोडक्यात निवेदन करतो. याचा हेतु असा की चरित्र आणि आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार मराठीत केव्हा नि कसा रुढ झाला हे आपल्या ध्यानात यावे. मराठी भाषेच्या उत्पत्ती विषयी प्रोफेसर कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचे विचार सर्वमान्य होण्या सारखे आहेत. ते म्हणतात (१) ' मराठी भाषा कोणत्याही एका विशिष्ट प्राकृतापासून निघाली नसून सर्व प्राकृत भाषांच्या मिश्रणापासून निघाली. त्यातल्या त्यात महाराष्ट्री आणि अपभ्रंश ह्या दोन भाषांचे अवशेष मराठीत पुष्कळ सापडतात. नारद स्मृतीत उल्लेखिलेल्या देशभाषांपैकी एक भाषा जर मराठी धरली तर तिची उत्पत्ती इ.स.च्या पाचव्या शतकात होऊन सातव्या शतकापर्यंत ती हळूहळू उत्क्रांत होत गेली. म्हणजे मराठी भाषेस इ.सन ७०० च्या सुमारास बोलभाषा म्हणून पूर्णत्व आलें असलें पाहिजे. '

याकरून असें अनुमान निघतें की मराठी भाषा सातव्या शतकापूर्वी बरेच वर्षे बोलली जात होती. परंतु मराठीत ग्रंथरचना व्हायला सातव्या शतकानंतर तीनशे वर्षांचा तरी काल लागला. कारण चक्रधरस्वामी, मुकुंदराज आणि ज्ञानेश्वर यांचें लिखाण बाराव्या तेराव्या शतकातले आहे. तेव्हापासून तर विसाव्या शतकाच्या चालू घटकेपर्यंत या भाषारूपी गंगोत्रीचा ओघ कसकसा वाढत गेला व आधुनिक मराठी वाङ्मयाला सुरुवात होऊन त्याची वाढ कशी झाली हें पाहणें ' मराठी वाङ्मयाचा इतिहास ' अशा स्वतंत्र ग्रंथाचें आहे. येथे फक्त आधुनिक मराठी वाङ्मयाला सुरुवात केव्हा झाली हें थोडक्यात पाहू या.

(१) मराठी भाषा उद्गम व विकास
प्रो.कृ.पां.कुलकर्णी पृष्ठ १७०

पाश्चिमात्य व्यापारी पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज इत्यादि अनेक युरोपीयन लोक फार पूर्वीपासून व्यापारानिमित्त हिंदुस्थानात येत होते. त्यापैकी इंग्रजांनी आपलें बस्तान हिंदुस्थानात ठीक बसविलें. हळू हळू तागडीच्या जोडीला तलवार हाती घेऊन त्यांनी हिंदुस्थानात राज्य स्थापन केलें. परंतु मराठ्यांचा आणि इंग्रजांचा प्रत्यक्ष संबंध अठराशे अठरात पेशवाई बुडाल्यावर आला. इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रातही सुरू झालें. त्यामुळे अर्थातच आपले लोक हळूहळू इंग्रजी भाषा व वाङ्मय यात पारंगत होऊं लागले. म्हणजे पाश्चिमात्य वाङ्मयाचा आणि आपला संबंध आला तो एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात.

पाश्चिमात्य वाङ्मय मोठें बलाढ्य म्हणूनच इंग्रजी भाषेला विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी वाघीणीचें दूध म्हटलें. कारण या पाश्चिमात्य वाङ्मयामुळेच स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्वांचा प्रसार आपणामध्ये झाला. तसेंच या पाश्चिमात्य वाङ्मयाच्या अध्ययनानेंच मराठी वाङ्मयाचें पीक वाढलें. या पाश्चिमात्य भाषेच्या संयोगाबद्दल डॉ. विश्वनाथ पांडुरंग दांडेकर म्हणतात (१) " मराठी साहित्य वृक्षावर इंग्रजी साहित्याचें कलम इतकें यशस्वी रीतीने केलें गेलें की त्यामुळे मूळचा वृक्ष विद्रूप न होता, उलट तो शतशाखांनी फुटला..बहरला. यात मराठी साहित्य व इंग्रजी साहित्य या दोघांचीही प्रशंसा अभिप्रेत आहे. वाटेल त्या झाडावर वाटेल त्या झाडाचे कलम यशस्वी होत नाही. उलट मूळ झाडाला किंवा कलमाला त्यामुळे अवकळा येते. तसें या कलमाच्या बाबतींत झालें नाही. आजच्या मराठी साहित्याकडे पाहिलें असतांना त्यातील जवळ जवळ प्रत्येक शाखा, इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणाने आपल्याकडे आलेली आढळेल. सुनीतें, निसर्गगीतें, आत्मनिष्ठगीतें, विडंबन काव्यें, नवीन प्रकारचीं अस्तित्वात्ववादी काव्यें, नवीन प्रकारच्या मनोविश्लेषणात्मक कथा, लघुकथा, लघुनिबंध, शोकांत नाटकें, नवीन प्रकारचीं एकांकी नाटकें, विनोदीकथा, दैनिकें, साप्ताहिकें, मासिकें, चरित्रें नि

---

(१) मराठी साहित्याची रूपरेषा (१९५२)
- डॉ. वि. पां. दांडेकर. पृष्ठ २०९

आत्मचरित्रें, इतिहास नि संशोधनात्मक प्रबंध या सर्वांकडे पाहिलें असतांना ते ते साहित्य प्रकार सुरू नि रूढ करणाऱ्या लेखकांनी इंग्रजी साहित्याचें ऋण कबूल केलेलें आढळेल. या साहित्य प्रकाराच्याच जोडीला एकोणीसाव्या शतकांत अखिल साहित्याच्याद्वारें पाश्चिमात्य संस्कृतीचा ठसा मराठी साहित्यावर जो उमटला तोही अभिनंदनीय असाच आहे. व्यक्ति स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, लोकशाही, बुद्धिप्रामाण्यवाद, नेमस्तपणा इत्यादि विचार भारतीय मनाला अपरिचित नसले तरी त्याचा प्रभावी उपयोग गेल्या दीडदोन शतकापासून आपण करूं लागलों आहोत. हे थोर विचार इंग्रजी साहित्याच्या मार्फतच मराठी साहित्यांत आले असें म्हणावयास हरकत नाही. ११

* * *

२ चरित्र आणि आत्मचरित्र हाही आधुनिक वाङ्मयप्रकार

तेव्हा इतर वाङ्मयप्रकारा प्रमाणेच चरित्र आणि आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकारही पाश्चिमात्य वाङ्मयामुळेच वाढीस लागला यात नवल नाही. संस्कृत आणि प्राचीन मराठी वाङ्मयात चरित्र आणि आत्मचरित्राचा अभाव आहे. जे थोडेफार चरित्रात्मक वर्णन आहे त्यात चिकित्सकवृत्तीचा अभाव दिसून येतो, तसेच कलात्मकदृष्टीही दिसून येत नाही. म्हणजे चरित्रकाराकडे पाहण्याचा .. दृष्टीकोन जेवढा व्यापक असायला हवा तेवढा नाही. यामुळे निवेदनाच्या तंत्रात, भाषेच्या बाबतीत किंवा चरित्रनायकाचे दोष दिग्दर्शन करण्यात चरित्रलेखकाने जेवढे लक्ष द्यायला हवे होते तेवढे दिलेले दिसत नाही.

परंतु हा दोष चरित्रलेखकाला चिकटविता येण्यासारखा नाही. याचे कारण असे की थोर पुरुषांच्या चरित्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन '(१) वाटे चरित्र त्याचे आपण काही तराव्या गावे ' हा असल्यामुळे या चरित्रात अवास्तव वर्णनाला वाव मिळाला आहे. या उलट पाश्चिमात्य वाङ्मयात लिहिलेली चरित्रे चिकित्सकदृष्टीने रेखाटलेली असल्यामुळे चरित्रनायकाचे गुण जसे पाहावयास मिळतात तसेच दोषही आपणास दिसून येतात.

(२) '' लिटन स्ट्रॅची याने लिहिलेल्या ' Eminent - Victorians ' या चरित्रग्रंथात फ्लॉरेन्स नाइटिंगेल या प्रसिद्ध स्त्रीचे चरित्र आहे. क्रिमियाच्या युद्धात रोग्यांच्या शुश्रूषेकरिता हिने केलेले परिश्रम व स्वार्थत्याग यांना इतिहासात जोड नाही. एकंदर रुग्णपरिचर्या या शास्त्राच्या वाढीसाठी तिने केलेले कार्य अपूर्व होय. जखमी सैनिकाबद्दलची कळकळ, तिचा

---

(१) मोरोपंत ' आदिपर्व '

(२) चरित्र, आत्मचरित्र टीका (१९४२)
प्रा. अ.म.जोशी, प्रा. पु.ग.माचवे
पृष्ठ ५२

प्रेमळपणा, इत्यादि गुणांनी त्या काळीच नव्हे तर अद्यापीही ती केवळ देवता मानली जाते. परंतु स्ट्रॅचीने तिच्या स्वभावाचें जें चित्र काढलें आहे त्यावरून असें दिसतें की रोग्यांशी वागतांना जो तिचा प्रेमळपणा व मनाचा कोमलपणा दिसत असे तो इतरांशी वागतांना दिसत नसे. पुढेपुढे तिचा स्वभाव चिडखोर व तिरसट झाला होता हें तिच्या पत्रावरून स्पष्ट दिसतें, आणि तें साहजीकच आहे. अत्यंत कार्यव्यापृत माणसें चिडखोर झाली नाहीत तरच आश्चर्य. आपल्या मतांच्या बाबतींत ती विलक्षण आग्रही नव्हे हट्टी होती. लुई पाश्चर व लिस्टर या शास्त्रज्ञांच्या जंतुविषयक उपपत्तीवर तिचा विश्वास नव्हता. खुल्या हवेचें तिला फार वेड. रुग्णालयांतील सर्व खिडक्या सताड उघड्या ठेवल्या पाहिजेत. बस्स मग ती इंग्लंडची हवा असो, तुर्कस्थानची असो की हिंदुस्थानची असो ! या बाबतीत ती कुणाचीही ऐकावयाची नाही. फ्लॉरेन्स नाइटिंगेलचें हे चित्र किती मानवी आहे ! रोग्यांना देवतेसारखी वाटणारी ही स्त्री अखेर मनुष्यच होती ना ! चरित्रनायकाला देवतेचें चित्र काढावयाचें नसून मनुष्याचें चित्र काढावयाचें आहे. आणि मनुष्य स्वभावाच्या निरनिराळ्या बाजू दाखविल्या नाहीत तर तें चित्र अपूर्णच राहणार ! !!

या एका उदाहरणावरूनही पाश्चिमात्य चरित्रकारांच्या आणि आपल्याकडील चरित्रकारांच्या दृष्टिकोनांत किती जमीन अस्मानाचा फरक होता हें दिसून येईल. यामुळेच पाश्चिमात्य चरित्रें वाचतांना आपण तल्लीन होऊन जातो. या दृष्टीने बॉसवेलने लिहिलेल्या डॉक्टर जॉन्सन यांच्या चरित्राकडेही बोट दाखविता येईल. हें चरित्र ! मराठी भाषेचे शिवाजी ! जे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांना आवडलें होतें, असें दिसतें. ते म्हणतात (१) " प्रस्तुत विषयाचें(डॉक्टर जॉन्सनचें)विवेचन आमच्या भाषेस अनेक प्रकारांनी केवळ अपूर्व होय. एक तर असें की या भाषेंत किंबहुना हिंदुस्थानांतील जुन्या नव्या कोणत्याही भाषेंत चरित्र लेखनाचा प्रकार मुळींच आढळत नाहीं.

---

(१) निबंधमाला तिसरी आवृत्ति १९२६
— विष्णुशास्त्री चिपळूणकर
पृष्ठ ६७०, ६७१

इतिहासाच्या अभावामुळे एकंदर राष्ट्रविषयींची जुनी माहिती अगदी बुडाली. त्या प्रमाणेंच चरित्राच्या अभावी प्राचीन काळी होऊन गेलेल्या महानमहान पुरुषांचें वृत्तही केव्हाच समूळ नष्ट होऊन गेलें आहे. .... म्हणूनच चरित्र लेखनाचा प्रचार पूर्वीपासून मुळीच नसल्यामुळे इकडच्या विद्यात पुरुषांचा जीवनवृत्तांत लिहिण्याचें मूळच खुटलें. ..... शिवाय चरित्रांचा उपयोग जर हा आहे की त्या पासून संसारास व लोकव्यवहारास उपयोगी असा सदुपदेश प्राप्त होतो तर हा उपदेश मोठमोठ्या सार्वभौम राजांच्या लढाया वाचल्यापासून जास्त होईल की सामान्य लोकास ज्या अडचणी व जे प्रसंग येतात ते त्यांच्या सारख्याच मनुष्यांनी कसे टाळले किंवा ते कसे उदयास आले हें समजल्याने जास्त होईल बरे ? ''

यावरून बॉसवेलने लिहिलेलें डॉक्टर जॉन्सन यांचें चरित्र चिपळूणकरांना आवडलें होतें असें दिसतें. तसेंच अशा त.हेचीं चरित्रें आपल्याकडेही लिहिलीं जावीत म्हणजे आपला सर्वतोपरी फायदा होईल असा त्यांना विश्वास वाटत होता म्हणूनच त्यांनी मोरोपंतांच्या कवितांचे सांगोपांग विवेचन करणारी प्रदीर्घ चर्चा निबंधमालेंतून सुरु केली. तेव्हां ही चर्चा सुरु करण्यास त्यांनी केलेलें डॉक्टर जॉन्सन यांच्या चरित्राचें अवलोकन बव्हंशी कारणीभूत झालें होतें असें म्हणायला हरकत नाही. याच कारणास्तव आपल्याकडेही अशीं चरित्रें लिहिलीं जावीत असें त्यांनी ध्वनित केलें आहे. तेव्हा आपला मुख्य मुद्दा असा की आधुनिक चरित्र आत्मचरित्र वाङ्मयाला जी जोराची चालना मिळाली ती इंग्रजी वाङ्मयामुळेच हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच.

* * *

४ आत्मचरित्रांचा हेतु कोणता ?

आता दुसऱ्या एका मुद्याची चर्चा करावयाची तो असा की आत्म.. चरित्रकाराचा आत्मवृत्त लिहिण्याचा हेतु कोणता ? म्हणजे आत्मचरित्रकार जेव्हा आत्मवृत्त लिहायला घेतो तेव्हा त्याचा उद्देश कोणता असतो ? या विषयी अनुमान करण्यापेक्षा प्रत्यक्ष आत्मचरित्रकारांनी जे उल्लेख अधूनमधून केलेले आहेत तें पाहणें फारच उपयुक्त होणार आहे. हे उल्लेख मी आत्मचरित्रकाराच्याच शब्दांत येथे देत आहे. अर्थात शक्य तोवर पाल्हाळ टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

अशात,हेंने निरनिराळ्या आत्मचरित्रकारांनी आत्मचरित्र लिहिण्याचीं जीं कारणें सांगितली आहेत तीं अवलोकन केल्याने आपला दुहेरी फायदा होणार आहे. पहिला फायदा असा की त्यामुळे आत्मचरित्रकाराच्या अंतरंगातील हालचालीकडे आपणास सहजासहजी डोकावता येणार आहे. त्यामुळे त्यांनीं लिहिलेलीं आत्मचरित्रें त्यांनीं ठरविलेल्या ध्येयाप्रमाणें उतरलीं आहेत किंवा नाहींत हें ठरविता येणार आहे. हें पाहता पाहता अर्थातच उत्कृष्ट आत्म .. चरित्राविषयींचे सामान्य सिध्दान्त आपणास दिसून येतील. तसेंच निकृष्ट आत्मचरित्र कोणतें याचेही नियम आपणास निश्चित करता येतील. आणि दुसरा फायदा असा की यापुढे आत्मचरित्र लिहू पाहणाऱ्या लेखकासाठी आपणास कांही किंतीवजा सूचना देऊन ठेवता येतील. कारण पुढच्यास ठेच मागचा शहाणा या प्रमाणें त्यांनी आत्मचरित्र लिहावयास घेण्यापूर्वी कोणत्या गोष्टी प्रामुख्याने पाळल्या पाहिजेत आणि कोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत याचें सांगोपांग विवेचन जर त्यांच्यापुढे असलें तर तें त्यांना मार्गदर्शन करूं शकेल असें वाटतें. आता प्रथम 'मी आत्मचरित्र कां लिहिलें ?' या विषयी काही

अा. ३३ ५६१

आत्मचरित्रकारांनी केलेलें विवेचन आपण प्रथम पाहू.

१ हितकारक विचार लोकांना कळविणें हा धर्म

(१) " बहुत दिवसापासून माझ्या मनात आलें आहे की आपणास जे जे विचार सुचतील ते ते टाकून ठेवावे. म्हणजे कालांतरी केव्हांतरी ते राहिले असता आणि कोणा सुज्ञ व समर्थ पुरुषाच्या हातीं लागले असता ते लोकहिताच्या कामास काहीतरी उपयोगी पडतील. सांप्रत आपल्या हातांत इतकेंच की जे विचार सुचतील ते लिहून ठेवावेत. इतकेंही येथे केलें नाही तर येथें जनाचा आणि पुढे ईश्वराचा अपराध केल्यासारखे होईल. लोकांचे कल्याण कसें होईल या विषयी आपले मनांत जे विचार उद्भवले ते सांप्रत नाही तर नाही, परंतु आपल्या मागेही जनास न कळविता तसेंच मनांत लपवून ठेवणें आणि ते देहासारखे नाशीवंत नसता त्यासही त्या बरोबर नाशाप्रत पाठविणें हा चौर्य कर्माहून मोठा अपराध आहे. यास्तव साधुबुध्दीने पाहता हितकारक विचार लोकांना कळवीत असावे हा मुख्य धर्म. "

२ आपला वृत्तान्त आपल्याच मनाला सादर करावा.

(२) " मग जुने आयुष्य नको तर जुन्या आयुष्यातील गतगोष्टींची आठवण तरी कां करावी आणि प्रस्तुत सारखें पुस्तक कां लिहावें असा प्रश्न कोणी करील. तर त्याचें उत्तर असे. म्हातारपणीं मनुष्य नवीन विचार स्वीकारीत नाही व नवीन उपक्रम आरंभीत नाही. पण यामुळे रिकाम्या पडणाऱ्या मनाला

(१) दादोबा पांडुरंग .. महाराष्ट्र ग्रंथ ..प्रदीपावलि ..प्रदीप सातवा
दादोबा पांडुरंग
पृष्ट १
(२) गतगोष्टी अर्थात माझी संसार यात्रा १९२९
न. चिं. केळकर
पृष्ट १२

काही व्यवधान लागतेंच व तें जुन्या आठवणी आठवों व आळविं याने मिळतें. आपण आपला व्याप कमी केल्याने आपलें घर आपल्याला पुरून उरू लागतें. मग त्याचा काही भाग भाड्याने द्यावासा वाटू लागतो. तेव्हा कोणी कोणी ' जागा भाड्याने देणें आहे ' अशी पाटी घरावर लावतात, व नवा भाडेकरू मिळाला तर घेतात. पण मनाची गोष्ट तशी नाही. तें अगदी रिकामें ठेवलें तर खायला उठतें. अशावेळी जुन्या ओळखीच्या स्नेह्यांना बोलावून घरीं गप्पा मारीत असल्याने घर कायमचें अडून राहात नाही, आणि मोकळें पडल्या प्रमाणें खायलाही उठत नाही. गतगोष्टींच्या आठवणीसारखा जुन्या निव्हाळ्याचा स्नेही गप्पा मारून वेळ घालविण्याला दुसरा कोण मिळणार ? पण त्याच त्या आठवणी नित्य आठवीत असण्याचाही एक प्रकारे कंटाळा येतो. तेव्हा वाटतें की त्या अशा नित्य आठवीत असण्यापेक्षा लिहून टाकून मोकळें व्हावें. कागदा वर लिहिल्या तरी त्या मनातून अगदीच जातात असें नाही. पण घरातील अडगळ काढून नीटनेटकी लावून ठेवल्याने जसें घर स्वच्छ होऊन बरें वाटतें, तसेंच जुन्या आठवणी लिहून काढल्याने काही नवीन व्यवस्था निर्माण केल्याचें समाधान होतें.

पण आणखी एक कारण आहे. कोणतेंही काम करून झालेल्या माणसाला त्या कामाचा वृत्तान्त साद्यंत संकलित असा कोणालातरी सादर करावयाचा असतोच. मग तो वरिष्ठाला असो किंवा बरोबरीच्या सह कामाला असो. आणि असा कोणी वरिष्ठ किंवा सहकारी नसला तर तो वृत्तान्त आपल्याच मनाला सादर करावा असें वाटतें. हा वृत्तान्त सादर करणें म्हणजे तो कामाच्या फलश्रुतीचा एक भागच समजला जातो. याच हेतूने प्रवासी लोक .. ज्यांना वर्णन शैली असते ते..प्रवास वर्णनें लिहितात. काही काही यात्रेकरूही आपली यात्रा वर्णने लिहितात. त्याच प्रमाणें आत्मचरित्र लिहिणारे आपल्या जीवनप्रवासाचा किंवा यात्रेचा वृत्तान्त लिहितात असें

म्हणायला काय हरकत ? आणि तसें पाहिलें तर जीवनासारखा महत्त्वाचा किंवा मनोरंजक प्रवास दुसरा कोणता असणार ? किंवा जीवनक्रमाला यात्रेची उपमा दिली तर ती योग्यच ठरेल. ज्यांना लिहिता येत नाही त्यांची गोष्ट निराळी. पण त्यांनाही लिहिता आले असते तर ते बहुधा लिहिल्याशिवाय राहते ना ! आपला वृत्तान्त लिहून काढल्याने आपल्याला आनंद होतो त्या प्रमाणें तो वाचणारालाही करमणूक होते. असें यात्रा वर्णनाच्या अनुभवावरून वाटतें. मी गतगोष्टी लिहिण्यास प्रवृत्त झालों तो याच कारणाने व याच हेतूने."

३ : संसारिकास बोध व आनंद मिळेल.

(१) " माझ्या चरित्रांत कोणास काही घेण्यासारखें नाही असें वाटतें तर हें चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याचा हा उद्योग मी केला नसता. दारिद्र्यांत वाढलेल्या पण डोकें वर काढू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस, काही नवीन वाङ्मयकार्य किंवा धर्मकार्य करू पाहणाऱ्या लेखकास व वक्त्यास, परमार्थाची तळमळ वाहणाऱ्या मुमुक्षूस, संसार सुखमय करावा असी वासना असणाऱ्या संसारिकास ह्या चरित्रापासून काहीतरी आनंद व उत्साह मिळेल असा मला भरंवसा वाटतो."

४ : स्वतःच्या करमणुकी - करिता लिहिल्या

(२)" माझ्या शिरावरील प्रपंचाचें ओझें ज्यावेळी सुनेने आपल्या शिरावर घेतलें, त्यावेळीं मी इतर कामें करावयास मोकळी झाले; स्वतःच्या करमणुकी करिता मी माझ्या आठवणी लिहू लागले. दत्तूला टिळकांचें एक मोठें चरित्र लिहावयाचें होतें. तेव्हां तो म्हणाला " आई तू आता आपल्या आठवणी लिहून काढ कशी, मला त्याचा उपयोग होईल. "

---

(१) चरित्रचन्द्र म्हणजेच पांगारकरांचें आत्मचरित्र ल.रा.पांगारकर पृष्ट १७

(२) स्मृतिचित्रें भाग ४ था (पुनर्मुद्रण १९५२)
लक्ष्मीबाई टिळक पृष्ट ९७

५ घोट किल्याप्रमाणें उपयोग होईल.

(१) " आमचीं चरित्रें मध्यम सामर्थ्याच्या युवयुवतींमध्ये,सामान्य मनुष्यालाही करता येण्यासारख्या काही गोष्टी आहेत अशी थोडीशी जाणीव उत्पन्न करू शकतील असा विचार माझ्या मनात आला. लोकोत्तर स्त्रीपुरुषांची व त्यांच्या खालोखाल विशेष सामर्थ्याच्या मनुष्यांचीं चरित्रें हीं छंडोपती अथवा बिलकरी किल्याप्रमाणें होत. अशीं चरित्रें वाङ्मयात चिरस्थायी होऊन राहावयाची. हे जाड व टिकाऊ कागदावर घातलेले किते आपल्यापुढे ठेऊन विद्यार्थ्यांनी त्यावर दृष्टि ठेवली पाहिजे. पण सामान्य विद्यार्थ्यांचें या किल्यांनी भागत नाही. अक्षरें गिरविण्यासाठी म्हणजे त्यांतून लेखणीचें सुकें अगर ओलें टोंक फिरविण्यासाठी त्यांना घोटकित्ते अगर वळणें लागत असतात. हीं कामाचा शिक्षक अथवा शाळेतला एखादा चांगल्या अक्षराचा मुलगा पाठकोऱ्या अगर पातळ कागदावर घालून देत असतो. हीं वळणें चुरगळलीं फाटलीं अगर त्यावर शाई सांडली तरी फारशी फिकीर नसते. या घोटकित्याप्रमाणें आमचीं चरित्रें सामान्य विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडतील असें मला वाटतें. या चरित्रांची आयुर्मर्यादा अर्थात घोटकित्याप्रमाणेंच असणार. पण तितक्या मुदतींत त्यांचा तेवढया पुरता उपयोग होईल असें मला वाटतें. आणि म्हणून मी या उद्योगाला लागलों. "

६ अनुभवांतून जग शहाणें होत आहे.

(२) " आत्मचरित्र लिहिण्यांत काही उदात्त हेतु असतो काय ?

(१) आत्मवृत्त (१९१५) धोंडो केशव कर्वे
प्रस्तावना.

(२) जीवन प्रवाह - श्री माधवराव खंडेराव बागल, सुरुवातीचे चार शब्द (१९५४)

" असला तर तो कलावंत श्रेष्ठ ठरतो. पण हेतु हा असतोच. माझा हेतु निव्वळ आनंद भोगावा हा नव्हता. ह्या आनंदात माझ्या हातून काही जनसेवा घडावी हा हेतु होताच होता."

" आत्मचरित्र लिहिल्याने जनसेवा कशी घडते ? "

" अनुभवातून जग शहाणे होत चालले आहे. मग माझे अनुभव तरी फुकट का जातील ? प्रत्येकाचे अनुभव काही निराळे असतातच. ते मनोरंजक असतात तसे उद्बोधकही असू शकतात. माझ्या जीवनात तसे अनुभव आढळले. त्याचे साथीदार मी इतरांना का करू नये ? सुखाला तसे दुःखाला वाटेकरी मिळाल्याने सुख दुणावते आणि दुःख कमी होते असा प्रत्येकाचा अनुभव नाही काय ?"

" यात प्रसिद्धीचा हेतु नाही काय ? "

" असेल, आणि आहे ही. पुस्तक प्रसिद्ध करणारा प्रसिद्धीसाठीच लिहितो. मग प्रसिद्धीचा हेतु नाही असे म्हणता तरी कसे येईल ? सत्ता आणि संपत्तीच्या वेडाहून हे वेड पुष्कळ बरे ! "

" सत्य जे घडले तेच लिहिले आहे ? पण किती ? "

" जरूर तेवढे ! सकाळपासून संध्याकाळपर्यंत अनेक गोष्टी घडत असतात. त्या काही मी लिहीत बसलो नाही. सांगाव्याशा वाटल्या त्याच गोष्टी मी सांगितल्या. प्रामाणिकपणे लिहिल्या. त्या सत्य लिहिल्या. पण माझ्या दृष्टीकोनातून लिहिल्या. त्यामुळे माझे निष्कर्ष बरोबर असतीलच असे मी कसे म्हणू ? आत्मसमर्थनाची वृत्ती डोकावणे अगदी अशक्य असे म्हणता येणार नाही. तथापी आत्मपरीक्षण आणि आत्मटीका ही टाळण्याचाही मी प्रयत्न केलेला नाही."

७ समाजसेवा करणाऱ्यांना स्फूर्ति मिळेल.

(१) " उच्च ध्येय व महत्वाकांक्षा ह्या दोहोंच्या बळावर साधारण माणसालाही विशेष शिक्षणाच्या अभावी देखील किती कार्य करता येण्या सारखे

---

(१) माझी कहाणी (१९३६) पार्वतीबाई आठवले
प्रस्तावना लेखक - धोंडो केशव कर्वे .. पृष्ठ १

आहे हें पार्वतीबाईंच्या चरित्रावरून शिकण्यासारखें आहे. पार्वतीबाई सारख्या कितीतरी स्त्रिया आपल्या समाजात कानाकोपऱ्यात दडून राहिलेल्या सापडतील. योग्य संधीच्या अभावी गुप्त सामर्थ्य वाया जात आहे. अशा स्त्रिया उजेडात आल्या तर त्यांच्याकडून केवढें तरी राष्ट्रकार्य होण्यासारखें आहे. सामान्य सामर्थ्याच्या निरपेक्ष बुद्धीने काम करणाऱ्या स्त्रियांची आज महाराष्ट्राला अत्यंत जरूरी आहे. सामान्यतः स्त्रीयांच्या उन्नतीचें आणि विशेषतः शिक्षण प्रसाराचें केवढें तरी काम होणें आहे. पार्वतीबाईचें चरित्र वाचून अथवा ऐकून ' आता आपल्या हातून काय होणार ? ' ह्या मंत्राचा जप करीत अज्ञातवासात असणाऱ्या प्रौढ विधवांना जर बाहेर उजेडात येऊन आपल्याला झेपेल तेंव कार्य करण्याची बुध्दि झाली तर पार्वतीबाईंच्या कहाणीचें चीज होईल."

सत्याजवळ जायला मदत होते.

(१)" लक्ष्मीबाई टिळकांची ' स्मृतिचित्रें ' किंवा इझाडोरा डंकनचे ' माय लाईफ ' या आत्मचरित्रांनी माझ्यावर जी विलक्षण मोहिनी घातली ती सौंदर्याची नव्हती, सत्याची होती. आत्मचरित्राचा मोठा विशेष हा आहे की त्यात प्रतिभेच्या विस्ताराला वाव असला तरी मूळ वस्तूचें स्वरूप बदलण्याचा तिला अधिकार नाही. त्यामुळे प्रामाणिक आत्मवृत्तें मनुष्याला सत्याच्या जितकें जवळ नेता येईल तितकें नेतात.

कॅसानोव्हा या प्रसिध्द प्रेमवीराच्या आत्मचरित्राचा परामर्श घेतांना झ्वाइग म्हणतो ' कुणीही आपली जीवनकथा सांगू लागतो तो काहीतरी हेतु मनात धरूनच. त्याचें सांगणें नुसतें सहेतुकच नसतें तर त्यात एक प्रकारचें नाट्यही असतें. आपण रंगभूमीवर उभे आहो, प्रेक्षकांचे डोळे आपल्याकडे

---

(१) जीवन प्रवाह- श्री. माधवराव खंडेराव बागल (१९५४)
भाग दुसरा पृष्ट २३६
' दोन शब्द ' लेखक ... वि.स.खांडेकर.

लागलेले आहेत याची जाणीव त्याच्या अंतर्मनात कुठे ना कुठे जागी असते. साहजीकच तो कुठलातरी विशिष्ट दृष्टिकोन स्वीकारतो. आपली भूमिका मनोवेधक व्हावी म्हणून धडपडतो. आपल्या प्रत्येक हालचालींचा प्रेक्षकावर काय परिणाम होईल याचा विचार करतो. फ्रँकलिन आत्मचरित्र लिहितो ते नीतिबोधाच्या दृष्टीने, बिस्मार्क तो महत्वाचा ऐतिहासिक स्वरुपाचा लढा मानतो. गटे कलाकृति या दृष्टीने आत्मचरित्राकडे पाहतो. नेपोलियन तें केवळ आत्मसमर्थनच नव्हें तर आत्मस्मारकही व्हावे अशी इच्छा बाळगतो. आत्मचरित्र लिहिताना नैतिक, ऐतिहासिक अथवा वाङ्मयीन क्षेत्रावर त्याचा परिणाम व्हावा ही इच्छा यांच्यापैकी प्रत्येकाच्या ठिकाणी आहे. त्यामुळे कळत न कळत त्यांच्या लेखनातल्या स्वैरतेला म्हणजेच सत्याला मर्यादा पडल्या आहेत. आत्मचरित्र लिहिताना प्रसिद्ध पुरुष भीति आणि विचार यांच्या छायेखाली वावरत असतो. लोकांच्या मनात आपली एक मूर्ति आहे तिच्याशी जिचा चेहरा मोहरा जुळेल अशी मूर्तीच आपल्या लिखाणातून तयार झाली पाहिजे, याची जाणीव त्यांना असते. साहजीकच सार्वजनिक माणसे संपूर्णतः वैयक्तिक होऊ शकत नाहीत. जनतेशी ती अनेक बंधनांनी निगडीत झालेली असतात."

०००

आत्म समाधान आणि जगाचें कल्याण.

५

आत्मचरित्रकाराने आपलें आत्मचरित्र कां लिहिलें म्हणजे आत्मचरित्र लिहिण्याचा आत्मचरित्रकाराचा हेतु कोणता या विषयाबद्दलचे विचार आपण आताच पाहिले. त्यावरून असें दिसून येतें की काहींनी आपलीं आत्मचरित्रें आत्मसमाधानासाठीं लिहिलीं आहेत तर काहींनी जगाच्या कल्याणासाठी लिहिलीं आहेत. आपलीं सुखदुःखें आपल्या सुहृदांना सांगणें हा मनुष्याचा स्वभावधर्मच आहे.

(१) " कारण मनुष्याला जीवनयात्रेंत जे बरेवाईट अनुभव येतात ते लोकांना सांगून टाकले म्हणजे त्याला हृदय हलकें केल्यासारखें वाटतें. 'स्निग्धजन संविभक्तं दुःखं सह्य वेदनं भवति' या न्यायानें आपलीं दुःखें दुसऱ्यास सांगितलीं असता त्याचा हृदयावरील भार निम्मा होतो, व आपल्या आयुष्यांतील सुखद प्रसंगांत दुसरा वाटेकरी झाला म्हणजे आपला आनंद दुणावतो. "

परंतु संत तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणें " बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाऊलें " हें तत्त्व या आत्मचरित्रकारांना लावलें म्हणजे या कसोटीला उतरणारीं आत्मचरित्रें किती आणि कोणतीं हें पाहणें आवश्यक आहे. कारण आत्मचरित्रकाराचा हेतु जरी उदात्त असला तरी त्याप्रमाणें त्याला आत्म चरित्र लिहिता आलेंच आहे असें नाही. याचें प्रमुख कारण असें की आपल्या जीवनांतील घडामोडीशी आपण इतके निगडित असतो की त्या सर्व घटनाकडे तटस्थवृत्तीने पाहणें आत्मचरित्रकाराला मोठें मुष्कीलीचें होऊन जातें. एवढेंच नव्हे तर आपल्या आयुष्यांतील घडामोडींकडे तटस्थवृत्तीने पाहणें आणि एखाद्या न्यायाधिशाप्रमाणें न्यायनिवाडा करून आपली चूक झाली असल्यास ती

---

(१) चरित्र आत्मचरित्र टीका - (१९४२)
प्रोफेसर अ. म. जोशी व
डॉक्टर प्र. ब. माचवे पृष्ठ १०४

सार्वजनिकरीत्या कबूल करणें हें खरोखर अवघड असें काम आहे.

म्हणूनच आपण प्रथम उत्कृष्ट आत्मचरित्राची कसोटी निश्चित केली पाहिजे.

* * *

६ उत्कृष्ट आत्मचरित्राची कसोटी कोणती ?

तेव्हा साहजीकच असा प्रश्न उद्भवतो की उत्कृष्ट आत्मचरित्राची कसोटी कोणती ? म्हणजे कोणत्या आत्मचरित्राला आपण उत्कृष्ट म्हणून समजावें ? किंवा आत्मचरित्रात असे कोणते गुण असले पाहिजेत की त्यामुळे त्याला सर्व मान्यता मिळेल ? कारण हें जोपर्यन्त आपण निश्चित करणार नाही तोंपर्यन्त अमुक एक आत्मचरित्र सरस आणि अमुक एक आत्मचरित्र निरस हें आपणास ठरविता येणार नाही. ज्या प्रमाणे बावन कशी सोने कोणतें हें ठरवितांना सोनार कसोटीच्या दगडावर त्या सोन्याला घासून पुसून पाहतो आणि नंतरच त्याची पारख करतो, त्याप्रमाणें उत्कृष्ट आत्मचरित्र ठरविण्याचें मोजमाप आपण निश्चित केलें पाहिजे.

या बाबतीत कोणकोणत्या गोष्टी आत्मचरित्रकाराने मोठ्या निष्ठेने पाळल्या पाहिजेत आणि कोणकोणत्या गोष्टी त्याने कटाक्षाने टाळल्या पाहिजेत हें आपण नमूद करून ठेवलें पाहिजे. प्रथम दर्शनी अशा गोष्टी निश्चित करणें अवघड वाटत असलें तरी तें तितकें नाही. कारण उत्कृष्ट आत्मचरित्रांत असें दिसून येतें की त्या आत्मचरित्रकाराने या गोष्टी मोठ्या काटेकोरपणाने पाळल्या आहेत. आणि हें तत्व त्याने जसें स्वतःच्या घडामोडी सांगतांना पाळले त्याचप्रमाणें इतराविषयी बोलतानाही पाळलेलें आहे असें दिसून येते.

या दृष्टीने एथेल मॅनिन या ग्रंथकर्तीचे विचार मोठे मननीय आहेत. ती म्हणते (१)" मी आणखीही कित्येक मनोरंजक गोष्टी सांगितल्या असत्या,

---

(१) चरित्र आत्मचरित्र टीका (१९४२)
प्रो. अ. म. जोशी, डॉ. प्र.ब.माचवे. - पृष्ट ११४

परंतु त्यांत इतर कांही लोकांचा संबंध येतो. मनुष्य स्वतः संबंधी सर्व रहस्यें खुलीं करण्यास मुखत्यार असला तरी दुसऱ्याच्या बाबतींत तसें करण्याचा त्याला काय अधिकार आहे ? अगदी आवश्यक वाटल्याशिवाय केवळ मनोरंजनाच्या हेतूनें दुसऱ्याबद्दलचीं रहस्यें सांगणें योग्य नाही. अर्थात आत्मचरित्र लिहितांना प्रत्येक मनुष्याला 'मी तुझ्याबद्दल अमुक अमुक लिहिलें आहे, तुला चालेल का ?' असें विचारीत बसण्याची आवश्यकता नाही. परंतु कोणत्या गोष्टी आत्म चरित्रांत घालणें आवश्यक आहे, कोणत्या गोष्टींनी निष्कारण एखाद्याचा उपमर्द अथवा निंदा होण्याचा संभव आहे इत्यादि गोष्टींचें तारतम्य अवश्य पहावयास पाहिजे.

बाईंचें हें मत कोणासही मान्य होण्यासारखें आहे. "

हें लक्षांत घेऊन आत्मचरित्रकारानें कोणकोणत्या गोष्टींकडे अट्टाहासपूर्वक लक्ष द्यायला हवें तें आपण क्रमाक्रमानें पाहू.

१ सत्य दर्शन.

आत्मचरित्रांच्या आणि आत्मचरित्रावरील टीकाग्रंथांच्या अवलोकनावरून स्पष्ट होणारी पहिली गोष्ट अशी की आत्मचरित्रकारानें सत्याचा पाठपुरावा केला पाहिजे. म्हणजे त्याच्या आत्मकथनाला सत्याची बैठक असली पाहिजे. कारण सत्याचा आधार असल्याशिवाय तें आत्मचरित्र वाचतांना आपण एकरूप होणार नाहीं आणि आपण वाचीत असलेलें आत्मचरित्र आपल्या सारख्याच हाडामांसाचे शरीर धारण करणाऱ्या व्यक्तीचें आहे असें तर आपणास बिलकूल वाटणार नाही. कारण सुखाच्या प्रसंगानें आपण खुदकन् हसतो आणि दुःखाच्या प्रसंगानें आपण चटकन दुःखी होतो. अगदी या

प्रमाणेच सुखदु:खाच्या प्रसंगांनी मुक्त असे प्रसंग आत्मचरित्रात रेखाटलेले नसतील तर त्या आत्मचरित्रकाराबरोबर आपण केव्हाही एकरूप होणार नाही.

म्हणूनच रूसोने आपल्या ' Confessions ' चा हेतु " To present my fellow mortals with a man in all the -

integrity of nature " म्हणजे ' मनुष्याचें सत्यपूर्ण चित्र रेखाटणें ' असा दिला आहे. म्हणजे सत्याचें किती महत्त्व आहे तें पाहा.

जगातील उत्कृष्ट आत्मचरित्र वाङ्मयात महात्मागांधी यांचे सत्याचे प्रयोग हें आत्मचरित्र गणलें गेलेलें आहे. हिंदुस्थानातील आणि जगातील मनुष्याचें जीवन सुखमय व्हावें म्हणून त्यांनी जो त्याग केलेला आहे, केवळ तेवढ्यामुळेच त्यांचें आत्मचरित्र उत्कृष्ट उतरलें आहे असें नव्हें. तर त्यांचें आत्मचरित्र सत्यावर आधारलेलें आहे म्हणूनच तें उत्तम ठरलें आहे. त्यांच्या आत्मचरित्रातील घटना सत्यावर आधारलेल्या नसत्या तर महात्मा गांधी मोठे पुरुष असूनही त्यांच्या आत्मचरित्राला पहिल्या पंक्तीत बसण्याचा मान कदापी मिळाला नसता.

म्हणून सत्याला आत्मचरित्राचा प्राण म्हणायला हरकत नाही. शरीरांत प्राण आहे म्हणूनच त्याचें महत्त्व आहे. तसेंच आत्मचरित्राचा प्राण म्हणजे सत्य होय. त्या शिवाय सर्वसामान्य माणसाला त्या आत्मचरित्रात आपलें प्रतिबिंब पाहायला मिळणार नाही, आणि त्या शिवाय त्या आत्म चरित्रा बरोबर आपण समरस होऊं शकणार नाही.

थोडक्यात म्हणजे आत्मचरित्रातील सर्व घटनांना सत्याची बैठक असलीच पाहिजे. हा आधार नसला आणि इतर आणखी कितीही गोष्टी असल्या तरी तें आत्मचरित्र वाचतांना ' अहो हें काही सत्य नाही, अहो हें काही सत्य नाही ! ' हा विचार वाचकांच्या मनांत पुन्हा पुन्हा डोकावल्या

शिवाय राहणार नाही. त्यामुळे त्या आत्मचरित्राबद्दल आपल्याला आपुलकी वाटणें तर राहूच द्या पण उलट तिरस्कार वाटल्याशिवाय राहणार नाही. अगदी एका वाक्यांत सांगायचें तर आत्मचरित्रांत सत्य नसेल तर त्याला आत्मचरित्र म्हणता येणार नाही. त्याला दुसरे काहीतरी नाव द्यावे लागेल. एवढें सत्याचें महत्त्व आहे. साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र 'स्मृतिचित्रें' ज्या अनेक गुणांमुळें सर्वांना प्रिय वाटलें त्यांतलें प्रमुख कारण असें की त्या स्मृति - चित्रांत पानापानावर सत्याचा शिडकाव केलेला आहे हें होय. म्हणूनच ल. रा. पांगारकर म्हणतात (१)" ह्या स्मृतिचित्रांत भाषेचा साधेपणा व विचारांचा प्रांजलपणा हे दोन गुण अत्युत्कृष्ट आहेत. पतीच्या, स्वतःच्या व इतर संबंधी माणसांच्या कृतींचें स्वभाववर्णन अगदी हुबेहूब व यथार्थ केलें आहे. साधेपणाला सत्याची जोड आहे. त्यांचे हे ग्रंथ आपल्या सहजपणामुळें व सत्यत्वामुळे चिरकाल लोकप्रिय होऊन राहतील. म्हणूनच मराठी वाङ्मयाला ते भूषणभूत झाले आहेत."

(२)" अतिशयोक्ति मुळीच न करता मी असें सांगू शकतो की महात्मा गांधींनी आपले सत्याचे प्रयोग लिहितांना जो मोकळेपणा व जी निर्भयता प्रगट केली आहे तो मोकळेपणा व ती निर्भयता लक्ष्मीबाईंच्या लेखनातही अत्यंत प्रकर्षाने आढळतो."

(३) " गृहजीवनाचें अत्यंत प्रामाणिक व रमणीय चित्र जर पाहावयाचें असेल तर श्रीमती लक्ष्मीबाई टिळक यांचीं स्मृतिचित्रें पाहावीं. कौटुंबिक जीवनाचें इतकें सुंदर चित्र कदाचित जगाच्या वाङ्मयातही पाहावयास मिळणार नाही."

---

(१) स्मृतिचित्रें - लक्ष्मीबाई टिळक
- ल. रा. पांगारकर यांचें मत पृष्ठ १६१..१६२.

(२) स्मृतिचित्रे - लक्ष्मीबाई टिळक, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचे मत
पृष्ठ १६८

(३) चरित्र आत्मचरित्र टीका (१९४२)
- प्रो. अ.म.जोशी, डॉ. प्र.न. माचवे, पृष्ठ १२२.१२३

असात,हेने 'स्मृतिचित्रे ' या आत्मचरित्राबद्दल अनेक अभिप्राय वाचल्यानंतर त्या आत्मचरित्रातील एखादा प्रसंग वानगी दाखल आपल्या समोर ठेवला तर वावगें होणार नाही. एका प्रसंगाचें वर्णन त्यांनी कसें केलें आहे पाहा.

(१)" पण आमच्या ख्रिस्ती बंधुभगिनींचा पुष्कळ वेळेस असा समज असतो की कोणा हिंदु माणसाकडून अधिक येणे जाणे किंवा मैत्री असली की तो ख्रिस्ती माणूस हिंदु होण्याच्या पंथाला लागला. आमच्याकडे पुष्कळ हिंदु येत, रहात, व ते मुलींचें बोर्डिंग. तशात वरील चमत्कारिक कल्पना, त्यामुळें पुष्कळ वेळेस भीक नको कुत्रे आवर अशी आमची स्थिती होत असे.

एक दिवस दुपारी दोन अडीचच्या सुमारास एक तरुण माणूस भेटायला आला. दत्तू त्यावेळी घरी नव्हता. त्या गृहस्थाचा पोषाख सरदारी थाटाचा होता. गुडघ्यापर्यंत कोट, घट्ट पायजमा, पायात चढाऊ बूट, अंगठी, छडी, घड्याळ.

"टिळक येथेच राहतात का ?"

"होय. तुम्ही कोठून आला ?"

"इंदूराहून"

मला वाटलें माझ्या रामभाऊ काकांनी टिळक वारलेले कळल्यामुळे कोणाला तरी पाठविले असावे. दत्तूच्या मुंजीत त्यांनी मला पैसे पाठविले होते. हे काका म्हणजे दिनकरशास्त्री खांबेट्यांचे चिरंजीव.

मी म्हटलें

"तुम्ही कोणा कडून आला ?"

"कोणाकडून नाही. माझा मीच आलों."

"कोणाला भेटायचें आहे ?"

"लक्ष्मीबाईंना व त्यांच्या मुलाला."

"असा. मुलगा गेला कामाला, मुलगी गेली कॉलेजांत, सून नातू

---

(१) स्मृतिचित्रे भाग - ४ था इ.स. १९३६ लक्ष्मीबाई टिळक पृष्ठ २३.२४

घरात आहेत. आणि लक्ष्मीबाई त्या मीच. खरेंच मी तुम्हाला ओळखलें नाही."

" कसे ओळखाल ! "

" आपलें नांव आडनांव काय ? "

" विठ्ठल दत्तात्रय घाटे "

नांव ऐकताच मला आनंदाचें भरतें आलें. मी त्याला पोटाशी धरलें. अश्रूंचे लोट त्याच्या स्वागतार्थ बाहेर पडू लागले. मी त्याला किंवा त्याच्या माणसांना कधी पाहिलें नव्हतें. पण त्याचे वडील ठिळकांचे प्रेमळ स्नेही होते. आम्ही नसतांना त्याचे आजोबा व आजीबाई नेहमी टिळकांचा समाचार घेत. झाल्याकेल्याला त्यांना आपल्या घरी नेत. त्या वेळेस हीं दोन मुलें ल्हानल्हान होतीं. मी सर्वांची विचारपूस केली. त्याने सांगितलें आम्ही आता नुसते दोन भाऊ काय ते आहोत.

" काय रे तू कविता करतोस का ?"

" हो."

" मग म्हण पाहू ! "

त्याने इतकी सुंदर कविता म्हणून दाखविली की काही पुसू नका. मी दुसरी म्हणायला सांगितली. तेव्हां त्याने संध्याकाळी पुन्हा येण्याचें कबूल केलें. सात आठच्या सुमारास वही घेऊन येतो व मग साऱ्या कविता म्हणून दाखवितो असें कबूल करून तो गेला.

तो गेल्यावर दत्तू, बेबी, घरी आली. त्यांना हें समजल्यावर फार आनंद झाला. रात्री आठ वाजता म्हटल्याप्रमाणें तो आला. आम्ही सारे तयार होऊन त्याची वाट पहात बसलों होतों. सारे म्हणजे घरांतील च सारे. त्याचें काव्यगायन रात्री एकपर्यंत चाललें होतें. तें काव्यगायन

मनोवेधक
कमालीचें मनोवेधक होतें. कविता सुरस, म्हणणें प्रेमळ व स्वभाव आनंदी. त्याने प्रथम म्हणून दाखविलेली कविता ' प्रेमाने ध्याऊं ' ही पुढे दत्तने ज्ञानोदयांत छापली व नंतर ती आमच्या उपासनासंगीतातही प्रविष्ठ झाली. दत्त कवींचा पूर्वीचा ऋणानुबंध पुन्हा अशा त-हेने कायम झाला."

श्रीमती रमाबाई रानडे यांनी न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या स्वभावाबद्दलचें केलेले ' वर्णनही असेंच बहारीचें आहे. त्या म्हणतात (१)"दररोज रात्री जेवण झाल्यावर घरातील मुलांच्या अभ्यासाची चौकशी करावयाची आणि काहीतरी वाचन सुरु असावयाचे. वाचनाच्या नादात झोप लागावयाची. एरव्ही झोप यावयाची नाही, अशी सवय झाली होती. साडे दहा किंवा अकरा वाजता झोप लागल्यावर तीन सवातीन वाजताच झोप पुरी होई. मग अंथरुणातच पडल्या पडल्या ईश्वरासंबंधी विचार अगर मनन चाले. हे झाल्यावर अंथरुणावरच उठून चारपासून पाच पर्यंत आपण स्वतः तुकारामाचे अभंग म्हणून टाळ्या अगर चुटक्या वाजवून भजन करावयाचे. त्यांत अत्यंत भक्तिपर व देवाशी लडीवाळपणाची सलगी केलेले नामदेवाचे अभंग घोळून घोळून पुन्हा पुन्हा म्हणावयाचे. पुष्कळ वेळा म्हणत असताना कंठ दाटून गहींवर येई. अशावेळी तोंडाने म्हणणें बंद पडून काही वेळ अश्रुधारा चालत असत. काही वेळा आपल्याशीच तल्लीनतेने अभंग म्हणत असताना आपण म्हणत आहो त्या अभंगाचा दुसरा चरण जुळत आहे की नाही इकडे लक्ष नसे. प्रथम एका अभंगाचा चरण म्हणावयाचा व दुसऱ्यांना दुसऱ्याच अभंगाचा चरण म्हणावयाचा. हे अभंग गाथ्यातील नसून त्यावेळी आपल्या मनाची स्थिती असेल तसे जुळवून म्हणावयाचे. त्यांचे यमक जुळते की नाही याकडे लक्षही नसे. अशावेळी मला फार हसू येई. व मी म्हणे " हा सगळ्या नवीन अभंगाची एक गाथा करून ठेऊं या. मी

(१) आमच्या आयुष्यातील आठवणी (.आवृत्ति सातवी १९५३)
रमाबाई रानडे - पृष्ट १७६ १७७.

कल्याण शिष्यासारखे लिहिण्याचें काम पत्करून हे सगळे अभंग लिहून काढते. म्हणजे बरे होईल.

हें ऐकून उत्तर येई की आम्ही आपली भाबडी माणसे, आम्हाला यमकें व तालसूर यांची माहिती नाही. ज्याच्या करिता आम्ही ते म्हणतो त्याला हे सर्व समजतात. त्याचें लक्ष ह्या इतर गोष्टींत कधी जात नाही."

यावरून आपणास असें दिसून येईल की आत्मचरित्रकाराने सत्यघटना जशाच्या तशा मांडाव्यात. आणि आपल्या स्वभावाबद्दलचें मत बनविण्याचें काम वाचकावर सोपवून द्यावें. यासाठी आत्मचरित्रकाराला आत्मचरित्र लिहितांना तटस्थता स्विकारता आली पाहिजे आणि सर्व घटनाकडे निःपक्षपातीपणाने पाहता आलें पाहिजे. एवढेंच नव्हे तर स्वतःच्या चुका जाहीर रीतीने कबूल करण्याचें मनोधैर्य त्याच्याजवळ असलें पाहिजे. हें कार्य अर्थातच अवघड असें आहे. परंतु अशक्य कोटीतलें आहे असें मात्र म्हणता येणार नाही, हें आपण आताच पाहिलें.

२ आत्मदर्शन

अनेक आत्मचरित्रांचें अवलोकन केल्यानंतर आढळणारा दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की आत्मचरित्रांतून आत्मदर्शन घडलें पाहिजे. " Paint me as I am " असें ऑलिव्हर क्रॉमवेल चित्रकाराला म्हणाला होता. तसें सांगण्यात अर्थातच त्याचा हेतु असा होता की मी जसा आहे तसेंच माझें चित्र रंगविलें गेलें पाहिजे. म्हणजे माझ्या चित्राकडे पाहून माझे नाक, डोळे, भुवया वगैरे जे चेहऱ्याचे अवयव आहेत ते जसेच्या तसे दिसले पाहिजेत. मी आहे त्या पेक्षा चित्रांत अधिक चांगला दिसावा म्हणून माझ्या अवयवांच्या ठेवणीत बदल होऊं नये. कारण क्रॉमवेल मोठा पुरुष असल्याने तो चित्रांत अधिक

चांगला दिसावा म्हणून चित्रकाराला चित्रातील क्रॉमवेलच्या अवयवांच्या ठेवणींत बदल करण्याचा मोह होणे अगदी साहजिक आहे. पण क्रॉमवेलला तें बिलकूल नको होतें.

परंतु मुरब्बी आणि निष्णात चित्रकार अवयवांच्या ठेवणींत बदल न करता रंगांच्या सहाय्याने त्या चित्राला असें कांही अद्वितीय आकर्षण आणून देतो की त्या चित्राकडे घटकान घटका पाहिलें तरी आपली तृप्ति होत नाही. कारण त्या चित्राकडे पाहिल्याने त्या व्यक्तीच्या अंतरंगाचेंही आपणास दर्शन घडतें. इतकें तें चित्र बोलकें असतें. म्हणजे सांगावयाचा मुद्दा असा की उत्कृष्ट चित्रकाराला हें अवघड आहे असें नाही. किंबहुना हें अवघड काम तो कौशल्याने करतो म्हणूनच त्याला प्रख्यात चित्रकार म्हणावयाचे.

अगदी हीच गोष्ट आत्मचरित्र लिहिणारालाही साधली पाहिजे. (१) "कारण चरित्रकार चरित्र विषयाच्या बाह्य जीवनाकडून आंतरजीवनाकडे जाण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे त्याच्या जीवनातील विविध प्रसंगावरून त्याच्या स्वभावावर किंवा मनःप्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो. तर आत्म चरित्रकार आपल्या मनःप्रवृत्तीच लोकांपुढे उघडया करून दाखवितो व त्यावरून निरनिराळ्या प्रसंगांची संगती दाखविण्याचा प्रयत्न करतो. अंगातून काढलेल्या सदऱ्याप्रमाणें आपलें अंतःकरण उलटे करून त्याची आतली बाजू आत्मचरित्रकार वाचकांना दाखवीत असतो. चरित्रकाराला फार तर त्याची सुलटी बाजू दाखविता येईल. त्या पलीकडे जाणे शक्य नाही. म्हणूनच मनुष्याचें खरेखुरे व्यक्तित्त्व आपणास पहावयाचें असेल तर त्याचें आत्मचरित्र वाचलें पाहिजे, असें म्हणण्यास हरकत नाही.

---

(१) चरित्र आत्मचरित्र टीका (१९४२)
प्रो. अ. म. जोशी, डॉ. पु. ब. माचवे,
पृष्ठ १०३ – १०४

साधारणपणें आपल्या आयुष्यांतील निरनिराळे प्रसंग, निरनिराळे अंतःकरणातील लढे, विचार अविचारांची आंदोलनें, इत्यादि प्रामाणिकपणे वाचकापुढे मांडून, आपल्या व्यक्तित्वासंबंधी अनुमान काढण्याचे त्यांच्यावर सोंपवावयाचें, एवढें धोरण ठेवून आत्मचरित्र लिहिलें असेल, तर तें स्वतःच्या व्यक्तित्वाचें चित्र सत्यापासून फारसें वेगळें होणार नाही, असें मानावयास हरकत नाही."

म्हणजे आपला मुद्दा असा की आत्मचरित्रांतील घटनांच्याद्वारें आत्मचरित्रकाराला आपल्या स्वभावाचें चित्र की ज्याला आपण आत्मदर्शन म्हणून म्हटलें आहे तें वाचकासमोर मांडता आलें पाहिजे. मी माझी आर्थिक, राजकीय, सामाजिक किंवा दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रांत उन्नति कशी करून घेतली, त्यासाठी मला कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावें लागलें, ज्यांच्यावर मी विश्वास टाकला त्यांनीच माझा विश्वासघात कसा केला, म्हणजे केला असेल तर, ज्यांच्याकडून काही अपेक्षा नव्हती त्यांच्याकडून ऐनवेळी मला मदत कशी मिळाली, निराश होण्याचे कोणकोणते प्रसंग आले आणि त्यातूनच मी मार्ग कसा काढला अशा एकनादोन आयुष्यांत इतक्या घटना घडलेल्या असतात की त्या सर्व सांगू म्हटलें तरी सांगता येणार नाहीत.

या घटनामधूनच व्यक्तिदर्शनाचा विकास कसकसा झाला हें स्पष्ट करण्यासाठी आत्मचरित्रकाराने योग्य त्या प्रसंगांची निवड केली पाहिजे. कारण आयुष्यांतील साऱ्याच सटरफटर गोष्टी सांगायचें ठरविलें तर त्यामुळें वाचकांना अगदी गुदमरल्यासारखें होऊन जाईल. म्हणून आत्मचरित्रकारानें प्रसंगांची गुंफण करतांना मोठ्या तारतम्यानें वागलें पाहिजे. जसें घोडेस्वाराला लगाम तर हातीं धरता आला पाहिजेच पण आपणाला कोठें जावयाचें आहे हेंही नक्की ठाऊक असून घोड्याला तिकडे नेता आले पाहिजे. जहाजाच्या कप्तानाला जहाज कोणत्या देशाच्या किनाऱ्यावर लावावयाचें आहे हें ठाऊक असायला नको का ? त्याचप्रमाणें आत्मचरित्रकाराने ' आपल्याला आपलें आत्मदर्शन म्हणजेच

स्वभावदर्शन वाचकांना घडवावयाचें आहे' असा दृढनिश्चय केलेला असला पाहिजे. आणि त्या प्रमाणे त्याने आयुष्यातील घटनांचा क्रम ठरविला पाहिजे.

उलट अशा तऱ्हेने आत्मदर्शन घडविण्याचें ध्येय आत्मचरित्रकाराने समोर ठेवलें नाही तर कोणती घटना सांगावी आणि कोणती सांगू नये हें त्याला ठरविता येणार नाही. त्यामुळे त्या आत्मचरित्रांतून व्यक्तिदर्शन होऊं शकणार नाही. आणि आत्मचरित्रकाराला आपल्या स्वभावाचें दर्शन वाचकांना घडवायचें नसेल तर त्याने आत्मचरित्र लिहिण्याची उठाठेव न केलेलीच बरी. अर्थात आत्मदर्शन घडविणे ही बाब काही सोपी नाही. परंतु सत्याची बैठक असल्यास अवघडही नाही हें सांगायला नको. पुढील उताऱ्यावरून ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल असें वाटतें.

(१) " मी इतकें लिहिलें आहे खरें पण मनांत विचार येतो की जसें शरीर पुरें उघडें करून दाखविता येत नाही तसें मनही उघडें करून दाखविता येणार नाही. आणि यदा कदाचित कोणी केलेंच तर तें लोकांना पाहवणारही नाही. प्रत्येकाच्या मनांत केव्हाना केव्हातरी वाईट विचार येतातच. वाईट इच्छा होतातच. त्या अगदी आत दडविलेल्या गोष्टी बाहेर काढता येणार नाहीत. आणि काढून तरी काय फायदा ! "

दादोबा पांडुरंग यांनी स्वतःच्या भीडस्त स्वभावाचें कसें वर्णन केलें आहे तें पाहा. (२) " जर मी त्या वेळेस अडून बसलों असतो तर ते (गृहस्थ) मला त्याच बैठकींत चार पांच हजार रुपये प्रथम देण्यास कबूल होते. खानबहादुराकडून दहावीस हजार रुपये काढण्याची ही अमोलिक संधी होती. तसें करावयास कोणी कुढलें नसतें. परंतु मला कोणी संकटांत असता त्यास अडवून त्याजवळून पैसा काढणें फार हलकें काम दिसे. मी त्या वेळेस फार गरीब मनुष्य होतों. पण माझा स्वभाव फारच भीडस्त. तो माझ्या कडून तसें कोणास अडवू देईना. परंतु या अशा भीडस्त स्वभावामुळें पुढे माझें फारच अनहित झाले हें सर्व समजून येईल."

(१) माझें पुराण (द्वितीयावृत्ति १९५१) आनंदीबाई कर्वे पृष्ट ..१२४.
(२) दादोबा पांडुरंग पूर्वार्ध, दादोबा पांडुरंग पृष्ट १६५.

प्रो. विठ्ठल यांनी त्यांच्या बंधुविषयी लिहिलेली पुढील माहिती पाहा. ते सांगतात (१)" सातारच्या युरोपियन क्रिकेटपटूंचा पुण्याच्या यंगमेन्स क्लब बरोबर सामना झाला. या खेळात रा. बाळू यांना बोलिंग करणे अवघड व्हावे म्हणून तिकडच्या खेळाडूंनी एक आठवडाभर रूळ चालवून पीच कठीण करून ठेवले होते. पण इतकी काळजी घेऊनही पी. बाळू यांच्या बोलिंगपुढे युरोपियनांचा या सामन्यात टिकाव लागू शकला नाही.. अवघ्या ८४ धावात सारे खेळाडू बाद झाले. व त्यापैकी सात विकेटस् रा. बाळू यांनी घेतल्या होत्या.

पुणे संघाचा या सामन्यात विजय झाला आणि हा विजय संपादण्याला कारण झाल्याबद्दल न्यायमूर्ती रानडे यांनी रा. बाळू यांच्याशी जाहीर सभेत हस्तांदोलन करून त्यांचा अभिनंदनपूर्वक गौरव केला. स्पर्शास्पर्श विचाराचा पगडा त्या काळच्या हिंदु समाजावर फार असल्यामुळे या प्रसंगानेही सनातनी मंडळीत त्या काळी बरीच खळबळ उडवून दिली होती.

तथापी गुणांची कदर खऱ्या गुणग्राहकाकडून त्यावेळीही झाल्यावाचून राहात नसे हेही या प्रसंगावरून दिसून आले. एका थोर राष्ट्रीय पुढाऱ्या .. कडून गौरविले जाण्याचे भाग्य रा. बाळू यांना वरील प्रसंगाशिवाय आणखीही एका दुसऱ्या प्रसंगी लाभले. रा. बाळू यांनी नोकरीनिमित्त पुणे सोडले त्या वेळी त्यांना निरोप देण्यासाठी एक छोटासा समारंभ पुणेकर मंडळींनी घडवून आणला होता. त्या समारंभात कै. लोकमान्य टिळक यांनी रा. बाळूंना स्वहस्ताने हार घालून त्यांच्या क्रिकेटमधील यशाबद्दल त्यांचे जाहीर अभिनंदन केले. हाही त्यांच्या आयुष्यातील एक मोठा संस्मरणीय असाच प्रसंग घडला."

---

१ माझे क्रीडा जीवन - पी. विठ्ठल पृष्ठ १४

२ सरळ, सोपी आणि सुंदर भाषा.

आत्मचरित्रांच्या अवलोकनावरून आढळणारा तिसरा मुद्दा असा की आत्मचरित्राची भाषा, सरळ, सोपी आणि सुंदर असावी. आता कोणी म्हणेल की सरळ, सोपी आणि सुंदर भाषा ओळखायची कशी? तर असे की जी भाषा सहजासहजी समजते आणि जिच्यामुळे लेखकाच्या अंतःकरणातले भावतरंग आपल्या मनात उभे राहून आपण त्यांच्याशी एकरूप होऊन जातो ती भाषा सरळ सोपी आणि सुंदर आहे असे समजायला हरकत नाही. कारण अशी भाषा सहजासहजी समजणारी आहे असे आपण मानतो. परंतु अशी प्रासादिक भाषा शैली संपादन करण्यासाठी लेखकाला कष्ट मात्र खूप करावे लागतात यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच प्रोफेसर ना.सी.फडके म्हणतात की (१)" भाषेचा वाचकावर जो परिणाम होतो तो दुहेरी असतो. शब्दांचा (अर्थ) आणि शब्दांचा (नाद) किंवा (ध्वनि) या दोघांचा मिळून तो परिणाम असतो. निदान असावयास हवा. वाचक जेव्हां काही वाचतो तेव्हां मुख्यतः त्या लिहिण्याचा अर्थ करून घेण्यासाठी तो वाचीत असतो. जे शब्द वाचले त्यात अर्थ कुठे सापडेल असा शोध वाचकाची बुद्धि करीत असते. परंतु त्या बरोबरच अजाणता वाचकाच्या मनावर त्या शब्दांच्या नादाचाही परिणाम होत असतोच. म्हणजे भाषेचे कार्य दुहेरी आहे. ती अर्थवाहक आहे व ध्वनिवाहक आहे. तिची ही दोन अंग एकमेकास अनुरूप असली म्हणजे वाचकाच्या वृत्तीला सुखविणारे एक अवर्णनीय माधुर्य किंवा शोभा तिच्या ठिकाणी उत्पन्न होते. भाषाशैली भाषाशैली

(१) लघुकथा लेखन तंत्र आणि मंत्र - प्रो .ना.सी.फडके [redacted]

असे जिला म्हणतात ती हीच शोभा. म्हणजे अर्थ आणि ध्वनि या दोन अंगांची परस्पर अनुरक्ति म्हणजे सुंदर भाषाशैली अशी माझी व्याख्या आहे.

परंतु भाषेत हा सहजपणा किंवा निर्मळपणा येतो तो कशामुळे ? या प्रश्नाचा तुम्ही नीट विचार केलात तर तुम्हाला दिसून येईल की या निर्मळपणाचा खरा उगम लिहिणाऱ्याच्या मनात म्हणजे विचारसरणीत असतो. जें काही सांगायचें तें लिहिणाऱ्याच्या मनांत अगदी स्पष्ट, रेखीव आणि निर्मळ स्वरूपात उभें असलें की तें सांगतांना त्याची भाषा आपोआपच निर्मळ,सफाईदार आणि प्रवाही होते. जें सांगायचें त्या विषयींची लेखकाची भावना तीव्र आणि उचंबळलेली असेल तर त्याच्या भाषेत आवेश येतो. लेखकाच्या विचारांचा आणि भावनांचा ओघ जितका जोमदार असेल तितका त्याचा आविष्कार करणाऱ्या भाषेला ओघ प्राप्त होईल. गति आणि चित्र या ज्या दोन गुणांचा मागे उल्लेख केला ते गुण भाषाशैलीला आवश्यक आहेत. परंतु त्या साठी लेखकाचे विचार आणि भावना यांच्या ठिकाणीच गति, ओघ, निर्मळपणा इत्यादि गुण हवेत. ज्या ज्या विख्यात शैलीकारांचीं नांवे तुम्ही ऐकली असतील त्यांची भाषा मनाचा ठाव घेणारी असण्याचे कारण नीट शोधलेंत तर तें त्यांच्या विचारांत आणि अंतःकरणात सापडेल. जितक्या व्यक्ति तितक्या भाषाशैलीच्या तऱ्हा संभवतात याचें कारण हेंच. चिपळूणकरांची शैली, टिळकांची, हरिभाऊंची, केळकरांची, खाडिलकरांचीं, गडकऱ्यांचीं अशी प्रत्येकाची स्वतंत्र भाषाशैली आपल्याला दाखविता येते. कारण ती तऱ्हा त्यांच्या अंतःकरणांत उद्भवलेली होती."

आता कोणी म्हणेल की आत्मचरित्रकाराने सत्याची कास धरावी आणि आपल्या आत्मदर्शनाचें चित्र हुबेहूब घडविण्यावर जोर द्यावा हें म्हणणें ठीक आहे. परंतु त्याने सरळ, सोप्या आणि सुंदर भाषेसाठीही जिवाचा आटापिटा करावा हें कशें काय ? तर असें की शिक्षक खूप ज्ञानी असला पण

Smt. HANSA MEHTA LIBRARY
MAHARAJA SAYAJIRAO UNIVERSITY OF BARODA
सत्यं शिवं सुन्दरम्
THE M. S. UNIVERSITY OF BARODA

विद्यार्थ्यांना शिकविण्याचें कसब त्याला अवगत नसेल तर त्याच्या ज्ञानाचा काय उपयोग ? नुकतींच उमललेलीं लाल गुलाबाची टपोरीं ताजीं टवटवीत फुलें पाहताच आपल्या चित्तवृत्ती प्रफुल्लित होतील हें खरें आहे, पण त्या फुलांना सुगंध नसला तर त्यामुळे आपला थोडातरी हिरमोड नाही का होणार ? त्याच प्रमाणें आत्मचरित्रकार कितीही मोठा पुरुष असला परंतु लिहिण्याचें तंत्र त्याने अवगत करून घेतलें नसेल तर त्याला सरळ, सोप्या आणि ओघवती अशा भाषेंत लिहिता येईल का ? आणि अशी सुलभ भाषा नसेल तर वाचकांना अडखळल्यासारखे नाही का होणार ! सामान्य वाचकाला तर या आत्मचरित्राचा काहीच आस्वाद घेता येणार नाही हें उघडच आहे.

म्हणूनच सोप्या भाषेचें महत्त्व सत्यदर्शन आणि आत्मदर्शन यांच्या इतकें जरी नसलें तरी 'भाषेचें महत्त्व काही नाही' असें मात्र बिलकूल म्हणता येणार नाही. हिरा कितीही तेजस्वी असला तरी त्याचें तेज फाकायला त्याला कोंदणातच नको का बसवायला ? चित्रकाराचें साधन जसें कुंचला आणि रंग तसेंच आत्मचरित्रकाराचें अंतरंगदर्शन घडविण्याचें साधन भाषा हेंच होय. अशात,हेंने सरळ, सोपी आणि सुंदर भाषाशैली नसल्यामुळे हजार हजार बारा बाराशें पृष्ठांचे आत्मचरित्रपर ग्रंथ अथपासून इतिपर्यंत हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या तरी लोकांनी वाचले असतील की नाही याची शंका वाटते. उलट वर उल्लेखिलेले दोन्ही गुण म्हणजे सत्यदर्शन आणि आत्मदर्शन यांच्याबरोबर सहजसुलभ भाषेची जोड लाभल्यामुळे लक्ष्मीबाईचीं 'स्मृतिचित्रें,' अण्णासाहेब धोंडो केशव कर्वे यांचें 'आत्मवृत्त,' रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या 'आमच्या आयुष्यातील आठवणी' आनंदीबाई कर्वे यांचें 'माझें पुराण' इत्यादि अनेक आत्मचरित्रें अजरामर झालेलीं आहेत असें म्हटलें तर अतिशयोक्ति उचित होणार नाही.

आता येथे सरळ, आणि सोप्या आणि ओघवती भाषेचे दोन नमुने देतो.

असे नमुने इतर आत्मचरित्रांत नाहीत असें नाही परंतु या प्रबंधाची मर्यादा ओळखून हात आखडता घेतला एवढेंच काय तें ।

धर्मानंद कोसंबी यांनी पाऊणशे वर्षांपूर्वी दलित लोकांच्या उध्दारा विषयी रेखाटलेलें चित्र सरळ, सोप्या आणि ओघवती भाषेमुळे कसें हृदयस्पर्शी झालें आहे तें पाहा. ते लिहितात (१) "उत्तर हिंदुस्थानांत उन्हाळा अत्यंत कडक असतो. एके दिवशी दुपारी मी त्या वडाच्या झाडाखाली बसलो असता मंदिराच्या पलीकडच्या बाजूला खोदण्याचें काम करणारा एक मजूर जैन लोकांच्या धर्मशाळेवरून घड्यांतून पाणी घेऊन चालला होता. त्याला मी कमंडलूंत थोडें पाणी घालण्यास सांगितलें. पण तो नम्रपणें म्हणाला " महाराज आपण म्हणता तसें मला करता येत नाही." मला वाटलें की वाटेंत थोडें पाणी दिल्याबद्दल काम करणारे इतर गडी लोक त्याजवर रागावतील, म्हणून तो पाणी देत नसावा. तेव्हां मी म्हणालों " मला पाणी दिल्याने तुझें जर कोणत्याही प्रकारें नुकसान होत असेल तर तू मला देऊं नकोस."

तेव्हा तो घडा खाली ठेवून माझ्या पायां पडून म्हणाला "महाराज! ओंजळभर पाणी दिल्याने माझें नुकसान तें काय होणार ? पण मी आता खरें सांगतों की मी जातीचा चांभार आहे आणि म्हणूनच आपल्या सारख्या उच्च वर्णांतील पुरुषाला पाणी देऊन मी पाप जोडू इच्छित नाही."

मी म्हणालो " रोहिदास हा देखील चांभारच होता. तरी त्याला सर्व जातीचे लोक मान देत असत. तशांत मी जातीभेद मानणारा मनुष्य नाही. तुझी जात कोण आहे हें मी जाणू इच्छित नाही. केवळ मला पाणी पाहिजे आहे आणि तें तू दिलेस म्हणजे पुरे आहे."

या प्रमाणे मी त्याला पुष्कळ उपदेश केला. तेव्हा निरुत्तर होऊन

---

(१) निवेदन (१९२४)
धर्मानंद कोसंबी .. पृष्ठ १२६ - १२७

पुनः एकवार पाया पडून तो मला म्हणाला "आपण वाटेल तो उपदेश करा, किंवा आपणाला मी अपराधी वाटत असेल तर माझा येथेच गळा कापा. पण हें पाप मात्र मला करावयास सांगू नका !"

साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांनी लिहिलेल्या 'गतगोष्टी' केळकरांच्या भाषाशैलीने नटलेल्या आहेत. (१)"विशेषतः प्रस्तावने दाखल त्यांनी लिहिलेला हृद्गत हा भाग केळकरांच्या ललित मधुर भाषाशैलीचा व पूर्णोन्मीलित कल्पनाशक्तीचा उत्कृष्ट मासला आहे." केळकरांनी सांगितलेली 'भलु आत्याची आठवण' त्यांच्या प्रासादिक भाषेचा नमुना म्हणून येथे द्यायला हरकत नाही. (२) "भलु आत्या ही बालविधवा. उपजीविकेकरिता तिला पुष्कळ मेहनत करावी लागे. रस्त्यांत पडलेले गायी बैलांचें शेण उचलून आणून त्याच्या शेणी लावून विकणें, शेतांत जाऊन जोंधळ्याचे सड उपटून आणून त्याचें जळण पुरविणें, अडीअडचणीच्या वेळीं कोणाच्याही घरीं जाऊन स्वयंपाकपाणी करणें, इत्यादि कष्ट तिला करावे लागत. ती निराश्रित असल्याने असल्या काबाडकष्टांनीच तिला जगतां येई.

पण शिवाय तिचें निर्वाहाचें एक स्वतंत्र साधन असे. तें म्हणजे अंगांत अवसर आणून देचूट व देवदेवस्की करणें, मोठ्या बाया बापड्यांना संकट पडलें किंवा दुखणें बाणें आलें की केव्हा केव्हा त्यांना अतिमनुष्य अशा दैवी शक्तीच्या आधाराचा उपाय करावासा वाटे. तसें झालें म्हणजे भलुआत्याला बोलावणें यावयाचें. मग तिनें जाऊन, मात्र घरांत पुरुष मनुष्य नाही असें पाहून घुमू लागावे, तांदूळ किंवा मोठी शिकार असली तर नारळ किंवा लोंब्याच्या वाट्या मागून द्याव्या, उडीद मंतरून चारी दिशांना फेकावे. आणि प्रत्यक्ष ईश्वराशी तारायंत्र सुरू केल्याच्या बहाण्याने सुचेल तो किंवा पचेल तो सुटकेचा उपाय सांगावा. उपाय मात्र फारसा कठीण नसे. कोंबडें बकरें बळी देण्या

---

(१) चरित्र आत्मचरित्र टीका (१९४२) प्रो. अ.म.जोशी, डॉ.प्र.ब.माचवे पृष्ठ १३९

(२) गत गोष्टी (१९३९) न. चिं. केळकर - पृष्ठ ११०

पर्यंत तिची मजल जात नसे. तर गुलाल पसरलेला भात व लिंबे चव्हाट्यावर लांब नेऊन ठेवणें, लहानसान दानें देणें, एवढ्यावर ती भागवून घेई. 'ईश्वरकृपा मेड इझी' अशातला तो प्रकार होता. चेटकिणीचीं वर्णनें मोठेपणीं इंग्रजी पुस्तकांत मी वाचली त्याचा लहानपणीचा हा छोटासा अनुभव आलेला होता.

तिचें लहान मुलांना आकर्षून घेण्याचें साधन म्हणजे गोष्टी वेल्हाळ. तिचें नाक नकटें, चेहरा पुरुषी, कुरूप व ओठावर मिशासारख्या राठ लवीचे खुंट ही दिसत! पण तिने गोष्टी सांगण्याला प्रारंभ केला म्हणजे तिचा तो चेहरा आम्हाला दिसेनासा होई आणि सर्व लक्ष गोष्टींत गढून जाई. तिच्या जवळ गोष्टींचा संग्रह आश्चर्यकारक होता. कारण तिच्याकडून एकदा ऐकलेली गोष्ट आम्हाला पुन्हा ऐकावी लागत नसे. उष्टी गोष्ट सांगण्याचा तिला स्वतःलाच कंटाळा येत असावा. एकदा आवडलेली गोष्ट विशेष आवडणारी म्हणून आम्हीच ती पुन्हा सांगण्याचा आग्रह केला तर नाइलाजाने ती सांगे. पण ती सांगतांना तिचें स्वतःचें मन तींत रमत नसे."

४ आत्मप्रौढी नसावी

अनेक आत्मचरित्रांच्या अवलोकनावरून आत्मचरित्रांत सत्यकथन आत्मदर्शन या गोष्टी प्रामुख्याने असाव्यात आणि त्यांच्या जोडीला सरळ, सोपी आणि सुंदर भाषाही असावी म्हणजे दुधांत साखर पडल्यासारखें होतें हें आपण आताच पाहिले. ~~म्हणजे~~ आता आत्मचरित्रांत काय काय नसावें हें ही आपण पाहू या. कारण कोणतेही कार्य करतांना काही गोष्टी अवश्य कराव्याच्या असतात तर काही गोष्टी निश्चयपूर्वक टाळाव्याच्या असतात.

एखाद्या माणसाजवळ पुष्कळ सद्‌गुण असतात आणि त्यांच्या जोरावर तो पुरुष कीर्तिमान व्हायला काही हरकत नसते. पण त्या सद्‌गुणांच्या बरोबरच त्या गृहस्थाच्या ठिकाणी एखादा असा दुर्गुण असतो की त्यामुळे

त्याच्या सदगुणाची किंमत मातीमोल ठरते. तो मनुष्य त्या दुर्गुणाच्या आहारी इतका गेलेला असतो की त्याची होत असलेली अधोगती त्याला दिसत असूनही तो मनुष्य त्या दुर्गुणाला तिलांजली देऊ शकत नाही. हें जसें खरें आहे तसें आत्म चरित्रकाराने कोणकोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत हेंही आपण पाहिलें पाहिजे.

या बाबत पहिली गोष्ट अशी की आत्मचरित्रकाराच्या ठिकाणी आत्मप्रौढी नसावी. कारण उघडच की घमेंडखोर मनुष्य दुसऱ्याच्या सदगुणांची जेवढी कदर करायला हवी तेवढी करणार नाही. तसेंच दुसऱ्याच्या ल्हानसहान दुर्गुणावर पांघरूण घालायला हवें हे ही त्याच्या लक्षात राहणार नाही. कारण उठल्याबसल्या 'मी मोठा' हा विचार त्याच्या मनात एवढा जबरजस्त असेल की त्यापुढे दुसऱ्याबद्दल जेवढी आपुलकी असायला पाहिजे तेवढी त्याच्या अंतः करणात असणार नाही.

मनुष्याला होणारा गर्व पैशाचा, अधिकाराचा, विद्येचा, लोक प्रियतेचा अगर कशाचाही असला की त्यामुळें तो गृहस्थ त्याच्या सहवासात येणाऱ्यांना तुच्छ लेखल्याशिवाय राहणार नाही. आणि अशात,हेंने जो मनुष्य आयुष्यभर दुसऱ्याला कस्पटासमान समजत आला त्याच्या आत्मकथनात अहंभाव आणि आत्मप्रौढी याशिवाय दुसरें काय असणार ? त्याने स्वतःच्या ~~स्वभावाचें~~ स्वभावाचें केलेलें वर्णन खरें असू शकेल का ? किंवा त्याने दुसऱ्याच्या दुर्गुणाची दिलेली माहिती सत्यावर आधारलेली असेल का ? उलट तो गृहस्थ उठल्याबसल्या 'माझीच बाजू खरी होती' किंवा 'माझेंच वागणं योग्य होतं' असें मोठ्या दिमाखाने सांगितल्याशिवाय राहणार नाही. यामुळें त्याच्या आत्मचरित्रांत सत्याची बैठक असू शकणार नाही हें उघड आहे. म्हणूनच आत्मचरित्रकार हा आत्मप्रौढी पासून दूर असला पाहिजे. कारण आत्मप्रौढी आली की सत्य दुरावलेंच म्हणून समजावें.

याचा एक नमुना म्हणून पुढील उतारा आपल्या समोर मांडतो.

" गांधींना जागतिक मोठेपणाची स्वप्नें " या मथळ्याखाली डॉक्टर खरे लिहितात (१) " या माझ्या प्रश्नाने महात्माजी उल्हसित झालेले दिसले. ते म्हणाले " अरे तू क्या बात करता है ! मैं तो अभी बूढा हूं ! मुझे ब्लड प्रेशर भी है ! ऐसी हालत में क्या मै इतनी लंबी सफर बरदास्त कर सकता हूं ! मेरी नाडी देखके बोल ! " असें म्हणून महात्माजींनी आपला उजवा हात नाडी दाखविण्याकरिता वर केला. कारण मी उभा होतो आणि महात्माजी बसलेले होते.

यावर मी म्हणालो " महात्माजी मै डॉक्टर तो जरूर हूं ! लेकिन अभी धंदा तो नही करता, किंतु आपकी सूरत देखके कह सकता हूं कि आप यह सफर बरदास्त कर सकेंगे ! कोई धोका नही होगा ! और आप सही सलामत वापस आयेंगे ऐसा मेरा विश्वास है !"

यावर महात्माजी म्हणाले " अरे तू ऐसा कहता है तो मै दक्षिण आफ्रिका जरूर जाऊंगा ! "

यावर मी म्हणालो कि आप यह बात कबूल करेंगे क्योंकि South Africa has been your first love - (दक्षिण आफ्रिका हा आपला पहिला आवडता विषय आहे.)

यावर महात्माजी म्हणाले " भाई देखो वैसा मै नही जाऊंगा ! लेकिन स्मट्स मुझे बुलावेगा तो मै जरूर जाऊंगा ! स्मट्स मेरा मित्र है ! और इसलिये वह शायद मुझे बुलावेगा ! "

यावर मी म्हणालो, " वह भी तो मायस हैं बग है ! वह राजी होगा तभी आपको भेजेंगे, वैसे कैसे भेजेंगे ! और उसको राजी करनेकी कोशीश हम कर रहे है ! "

यावर महात्माजी म्हणाले " अगर तूने यह बात करली तो बडी बात

---

(१) माझीं गेलीं बारा वर्षे (पूर्वार्ध .. १९५५)
डॉ. ना.भा.खरे पृष्ठ १६८.१६९.

होगी । तू कोशीश कर । मैं जरूर जाऊंगा । और तूझे व्हॉइसरायके कौंसीलका इस्तीफा देनेकी जरूरत नही। तू जहा है वहा रहता चला जा और अफ्रिक आफ्रिकाके हिंदी लोकोका प्रश्न मिटाने के बारे मे कोशिश कर। तूने अगर यह बात करली तो कॉंग्रेसके खिलाफ तूने जो पाप किये होंगे वे सब तेरे को माफ ।"

अशारितीने महात्मागांधी व माझ्यात झालेला हा संवाद संपला. महात्मा गांधी अत्यंत उल्हसित होते, आणि दक्षिण आफ्रिकेंत शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून जाण्याकरिता ते अत्यंत उत्सुक होते. हें या संवादावरून दिसून येईल. कारण अशा रितीनें युध्दकाळी विमानाने दक्षिण आफ्रिकेंत जाण्यांत त्यांना त्यांच्या जागतिक मोठेपणाचीं स्वप्नें दिसत होतीं.

पण त्यांना दक्षिण आफ्रिकेंत जाण्याचा आग्रह करण्याचें माझें कारण अत्यंत निराळे होतें. त्यांना मोठेपणा देण्याचा माझा हेतु मुळीच नव्हता. माझा हेतु गांधीजी आयत्या वेळेस अवसानघात करून अपमानकारक तडजोड करून देशाला कसे खाली पाहायला लावतात हें पुन्हा एकदा दाखवून त्यांचें सत्य स्वरूप उघड करून त्यांचा सूड घ्यावयाचा होता. कारण गांधीजींच्या राजकारणाच्या पूर्व अनुभवावरून मला खात्री होती की गांधीजी दक्षिण आफ्रिकेंत गेले की काहीतरी थातुरमातुर करून आपला मित्र स्मट्स याच्याशीं तडजोड करतील. ती तडजोड हिंदुस्थानला नुकसान करणारी व अपमान करणारी असेल याबद्दल मला संशय नव्हता. तशी तडजोड करून गांधीजी हिंदुस्थानांत परतले म्हणजे ती देशाला अपमानकारक आहे म्हणून ती झिटकारण्याचा हिंदुस्थान सरकारचा एक कार्यमंत्री म्हणून मला अधिकार होता. असें झालें असतें म्हणजे गांधीजींना खाली पाहायला लावून त्यांच्यावर मला सूड घेता आला असता."

डॉ.खरे यांच्या या अशा लिखाणाबद्दल श्री पुरुषोत्तम यशवंत देशपांडे त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हणतात (१)"डॉ. त्यांचीं मतें सर्वांना सुपरिचित होऊन बसलीं आहेत. वैयक्तिक अपमानाच्या शल्यांतून तीं जरी आकारास आलेलीं असली तरी कॉंग्रेसच्या नैतिक अधःपातामुळे त्यांना एक निराळे व नवें सामाजिक महत्व आता प्राप्त होऊ लागलें आहे. असें असलें तरी वैयक्तिक व्देषाचीं व सूडाचीं भावना जी वारंवार या ग्रंथांत डोकावते ती अनेक वाचकांना बोचल्याशिवाय राहणार नाही. देशाचें भवितव्य पुढाऱ्यांच्या खाजगी वैमनस्यावर एक खेळणें बनणें हें कोणत्याही सुसंस्कृत राष्ट्राला भूषणावह ठरण्यासारखें नाहीं.

अपमानाचें शल्य आणि तज्जन्य व्देषभावना व सूडबुध्दि यांचा त्याग करूनच डॉक्टरांना आता देशोध्दाराचा विचार करावा लागेल. असें जर ते करू शकतील तरच त्यांच्या अनेक सद्गुणांचें चीज होईल."

५ आपपरभाव नसावा, तटस्थपणा असावा

अनेक आत्मचरित्रांच्या समीक्षणांतून आत्मचरित्रांत काय नसावें या विषयी ध्वनित होणारा दुसरा मुद्दा असा की आत्मचरित्रकाराजवळ आपपरभाव नसावा. कारण आपपरभाव असला की आपल्या डोळ्यातले मुसळ दिसत नाहीं पण दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ मात्र दिसते. आणि मग आपला तो बाळ्या आणि दुसऱ्याचें तें कारटें अशा,हेचें वर्तन आपल्या हातून आपोआपच घडतें. याचा परिणाम असा होतो की आपल्याशी संबंध आलेल्या व्यक्तींचा स्वभाव आपणाला आवडत नसेल तर त्यांची बाजू ही चुकीचीच आहे असें आपण गृहित धरतो. त्यामुळे त्यांच्या लहानसहान वागणुकीतही आपणाला विकृतीच दिसते. म्हणजे त्यांचें वागणें बरोबर असूनही आपल्या आपपरभावामुळे आपल्याला चुकीचें व अयोग्य वाटतें. अशामुळे आपण त्यांच्याशी अन्यायाने वागतो. अशा,हेने

(१) माझी गेली बारा वर्षे (उत्तरार्ध १९५५)
" डॉ. ना.भा.खरे. प्रस्तावना लेखक श्री. पु.य.देशपांडे.

आयुष्यभर आपपरभावाची पगडी डोक्यावर धारण केलेल्या माणसाने आत्मचरित्र लिहिलें तर त्यात असत्य पुन्हा पुन्हा डोकावणार नाही का ? आणि वरती तो आत्मचरित्रकार म्हणणारच की 'अहो! अमक्या अमक्या वेळी आम्ही अज्ञात, हेंच वागलों तेंच खरोखर योग्य होतें. त्या ' क्ष ' नावाच्या इसमानें गैरसमज करून घेतल्यामुळे मात्र पुढचा अनर्थ ओढवला. म्हणतात ना स्वभावाला औषध नाही. दुसरें तें काय!' तेव्हा अशा निवेदनांत सत्य किती आणि असत्य किती हें ओळखणें मुष्कीलीचें होऊन जातें.

म्हणजे आपला मुद्दा असा की आत्मचरित्रकाराने आपल्या आयुष्यांतील घटनाकडे तटस्थवृत्तीने पाहिले पाहिजे. ही तटस्थवृत्ती स्वीकारल्याशिवाय आपल्या गुणदोषांचे योग्य मूल्यमापन आपणास करता येणार नाही. तसेंच दुसऱ्यांच्या गुणदोषांकडे निर्मळमनाने पाहताही येणार नाही. यास्तव आत्म चरित्रकाराजवळ आपपरभाव असू नये.

(१) "पूर्वायुष्यात आपण स्वतःला ' कोणीतरी ' समजत असतो. परंतु अखेरीस मागे वळून पाहिल्यावर असें वाटतें की आपण जणू काही कोणी यात्रेकरू असून जीवितपथावर आपलीं पदचिन्हें उमटवीत चालत आलों आहो, यापेक्षा जास्त काही नाही. स्वतःच्या जीवनाकडे पाहावयाचें म्हणजे आपल्या जीवनाबद्दलच्या वासनेची हाकालपट्टी केली पाहिजे. त्याशिवाय तटस्थवृत्ति अंगी बाणणें शक्य नाही. वासनारहित दृष्टीने आपल्या जीवनाकडे पाहण्याइतकी तटस्थता प्राप्त झाली म्हणजे आपले दोष , आपल्या हातून घडलेलीं कुकर्मे इत्यादिकांचा अपलाप करण्याची बुद्धि होण्याचें कारण नाही. मनुष्य प्रामाणिकपणाने व मनमोकळेपणाने आपल्या गुणदोषांचें दिग्दर्शन व चर्चा करू शकेल."

तेव्हा आपला मुद्दा असा की ही तटस्थवृत्ति केव्हा येणे शक्य आहे ?

(१) चरित्र आत्मचरित्र टीका (१९४२)
प्रो. अ. म. जोशी आणि डॉ. प्र.ब. माचवे, - पृष्ठ १२७.

तर जेव्हा मनुष्याच्या मनांत पूर्णपणे आपपरभावाचा लोप झाला असेल तेव्हाच. कारण त्याचवेळी तो निर्मळमनाने आपले दोषही दाखविण्यास कचरणार नाही, किंवा दुसऱ्यांच्या सद्‌गुणाबद्दल त्यांची पाठ थोपटण्यासही कां कू करणार नाही.

साहित्यसम्राट न.चिं. केळकरांच्या 'गतगोष्टी' उत्कृष्ट उतरल्या आहेत याबद्दल दुमत नाही. परंतु (१) " त्यांच्या 'गतगोष्टी' ला अशाच आत्मसमर्थनाचा वास येतो. पहिल्या काही वर्षांचा वृत्तान्त केळकर यांनी जसा तटस्थवृत्तीने लिहिला आहे असा पुढचा भाग ते लिहू शकले नाहीत. कारण आपल्या योग्यतेबद्दल आपण स्वतः निकाल देण्यापेक्षा दुसऱ्यांनी तो द्यावा हें अधिक योग्य मानलें जातें. आपण आपले हेतु, आपलें कार्य, आपली ध्येयें जशी असतील तशीं लोकापुढे मांडली तर त्या आत्मसमर्थनाला गौणत्व येण्याचें कारण नाही. परंतु आपल्या योग्यते संबंधी, आपल्या कार्याच्या महत्त्वा संबंधी आपणच निकाल देऊं लागलों तर तें काहींसें गौण आहे. आपलें कार्य आपले हेतु इत्यादि केवळ जनतेपुढे मांडणे व निकाल देण्याचें काम लोकावर सोपविणें हा योग्य मार्ग आहे. मी शहाणा आहे हें सिद्ध करण्याकरिता दुसरे मूर्ख आहेत असें म्हणण्याचें कारण नाही. इतकेंच नव्हे तर मी शहाणा आहे हे ही आपल्या तोंडानें सांगण्याचें कारण नाही. केळकरांच्या ..
'गतगोष्टीं' चा शेवटचा आत्मनिरीक्षणाचा भाग ज्यांनी वाचला असेल त्यांना असें खरोखर वाटलें असेल की केळकरांनी तेवढा भाग लिहिला नसता तर बरें झालें असतें."

तटस्थवृत्ती स्वीकारल्यामुळे लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रें' आपपरभावापासून पूर्णपणें अलिप्त आहेत. याबद्दल प्रोफेसर अ.ना.देशपांडे म्हणतात. -

---

(१) चरित्र आत्मचरित्र टीका (१९४२)
प्रो. अ. म. जोशी आणि डॉ. प्र.ब.माचवे पृष्ट ११०

(१) " म्हणूनच लक्ष्मीबाई टिळकांचीं 'स्मृतिचित्रें' भाग १ ते ४ इ.स. १९२४ ते १९३६ हीं तर अपूर्व स्वरूपाच्या गोड कांतीने संपन्न आहेत. आधुनिक मराठी वाङ्मयात 'स्मृतिचित्रें' हीं आत्मचरित्र म्हणून निरपवाद अजोड आहेत. एक अत्यंत अल्पशिक्षित स्त्रीने लिहिलेलें हें रसोत्कट व प्रत्ययोत्पादक आत्मचरित्र वाचलें म्हणजे हें सहज पटावें की सरस वाङ्मयनिर्मितीच्या दृष्टीने शालेय शिक्षणाची मातब्बरी फारच बेताची आहे. 'स्मृतिचित्रें,' म्हणजे साहित्य 'लक्ष्मी' ने मराठीच्या आत्मचरित्रात्मक वाङ्मयाच्या अंगावर घातलेला एक बहुमोल दागिना आहे."

या उलट नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे आपपरभावाला बरेच बळी पडलेले आहेत. त्यांच्या आत्मचरित्रात त्यांचा आपपरभाव अगदीच उग्र स्वरूप धारण करतो. त्यामुळें त्यांनी दुसऱ्यांच्या दोषांचें भडक वर्णन करून स्वतःचें समर्थन करण्यात भूषण मानलेले आहे. म्हणूनच असें म्हणावेसें वाटतें की आपपरभावाचा अतिरेक झालेलें पुस्तक म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचें आत्मवृत्त. (२) श्री. जोशी आणि श्री. माचवे म्हणतात " त्यांच्या आत्मचरित्रांत दुसऱ्यावर केलेल्या दोषांचा इतका अतिरेक झाला आहे की त्यांनी आत्मचरित्र अजिबात लिहिलें नसतें तर फार बरें झालें असतें असें वाटू लागतें. क्षुल्लक बाबतींत कोल्हटकरांसारख्या थोर साहित्यिकाने दुसऱ्यावर तोंडसुख घेतलेलें पाहून कोणाचाही असाच ग्रह होईल की साहित्यिकांचा सगळा थोरपणा त्यांच्या पुस्तकातच असतो की काय ! प्रत्यक्ष वर्तन पहावें तें हें असें !"

कोल्हटकर राम गणेश गडकरी यांच्याबद्दल काय लिहितात पहा (३) " या सुमारास दुसऱ्या एका व्यक्तीशी माझा परिचय झाला. मात्र

(१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग दुसरा (१९५८) – डॉ. अ.ना.देशपांडे पृष्ठ ६७१, ६७२.

(२) चरित्र आत्मचरित्र टीका – प्रा. अ.म.जोशी, डॉ. प्र.ब.माचवे, पृष्ठ ११२

(३) कोल्हटकरांचें आत्मवृत्त – प्रथमावृत्ति १९३५ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर .. पृष्ठ ५८ आणि ६१

तिजपासून मला प्रेरणा न होता मजपासून तिला मिळाली. ही व्यक्ति म्हणजे प्रसिद्ध कवि नाटककार व विनोदी लेखक राम गणेश गडकरी हे होत. यांच्या नावाचा निर्देश वर नुकताच करण्यात आला आहे. हे प्रथम माझ्या व्देष्ट्यापैकी होते. माझीं नाटकें स्वतंत्र नसून इतर पुस्तकांच्या आधारें लिहिलेलीं आहेत असा यांचा समज असे. पण तो केवळ दुराग्रह आहे अशी यांची क्याच वाचना अंती खात्री झाल्यावर ते माझ्या नाटकांचे निस्सीम भक्त बनले. मी बार्शीला जाण्यापूर्वी पुण्यास असतांना हे माझी भेट घेण्याचा प्रयत्न करीत. मी संध्याकाळी बहुधा बुधवारातील पपूरेट (मुजुमदारांचे स्नेही व किर्लोस्कर कंपनीचे हितचिंतक आहेत) नावाच्या गृहस्थाच्या दुकानी बसत असे. म्हणून ते मला पाहण्याला त्या दुकानापासून काही अंतरावर येऊन उभे राहात. परंतु त्यांची माझी दृष्टादृष्ट मी बार्शीला जाई पर्यंत झाली नाही. त्या सुमारास त्यांना काही कारणामुळे वैराग्य उत्पन्न झालें असून ते वेडे होण्याच्या मार्गाला लागले होते, परंतु माझ्या लेखांनी त्यांच्या मनाला खाद्य पुरवून त्यांचें वेडापासून रक्षण केलें असें ते पुढे पुढे म्हणत असत."

कोल्हटकरांच्या मनांत सूडाची भावना कशी होती तें पाहा. ते म्हणतात " विशेष ऋणानुबंध असलेल्या गृहस्थापाशी पैशाची गोष्ट काढणें माझ्या नेहमी जिवावर येते. माझ्या स्वभावातील हें मर्म मुजुमदारांनी व जोगळेकरांनी ओळखलें असून त्यांनी ' प्रतिविकार ' नाटकाच्या रकमे संबंधाने त्याचा चांगलाच फायदा करून घेतला. अखेरीस त्रासून पुढे कोणतेंही नाटक किर्लोस्कर कंपनीस न देण्याचा मी निश्चय केला. इतकेंच नाही तर पुढील नाटक गद्यरूपानें व 'किर्लोस्कर कंपनीस' करावयास जड जाईल असें लिहावयाचें ठरविलें व त्याकरिता त्या नाटकांत जुळीं मावळें घालण्याचा संकल्प केला."

दृष्य

म्हणूनच डॉ. वि.भि.कोल्ते म्हणतात की (१) " याच्या उलट दृश्य पाहावयाचें असेल तर वाचकांनी कोल्हटकरांचें 'आत्मवृत्त' वाचावें. आपल्या सान्निध्यांत आलेल्या व्यक्तींवर खवचटपणाने व कुत्सितपणाने केलेल्या आरोपांनी बरबटलेलें दुसरें आत्मचरित्र मराठींत क्वचितच सांपडेल."

६ अतिशयोक्ति नसावी

आत्मचरित्रकाराने आत्मप्रौढीला बळी पडू नये आणि आपपरभावाला मुळीच जागा देऊ नये हे आपण आताच पाहिले. याच्याच जोडीला आत्मचरित्रकाराने काळजी घ्यावी ती अशी की त्याने आत्मचरित्रांत अतिशयोक्तीला स्थान देऊ नये. कारण अहंभाव आणि आपपरभाव यांचें मेतकूट झालें तर अतिशयोक्तीला अवसर मिळणार नाही असें होणेंच शक्य नाही. एकटी आत्मप्रौढीच एवढी भयंकर आहे की तिचा वरचष्मा ज्याच्यावर आहे तो अतिशयोक्तीला बळी पडलाच म्हणून समजावें. ज्या प्रमाणें एका वाईट व्यसनांतून दुसरें वाईट व्यसन डोकावतें आणि मनुष्य हळूहळू व्यसनांच्या अधिकाधिक आहारी जातो, त्या प्रमाणें आत्मप्रौढीतून आपपरभाव निर्माण होतो. आणि आपपरभाव आला की मनुष्य स्वतःच्या दुर्गुणाकडे डोळेझाक करतो आणि दुसऱ्यांचे दुर्गुण फुगवून सांगू लागतो. या क्रिया त्याच्या हातून इतक्या सहजासहजी घडतात की आपण दुसऱ्यावर अन्याय करतो आहे हें त्याला खरेंच वाटत नाही. म्हणूनच वर्णनांत पाल्हाळ येणार नाही, चुकीची माहिती असणार नाही किंवा दुसऱ्यावर अन्याय होणार नाही याची आत्मचरित्रकारानें फार काळजी घ्यायला पाहिजे.

कारण आत्मचरित्र हे घडलेल्या गोष्टींचें वर्णन आहे. वास्तविक पाहिलें तर आत्मचरित्रांत अतिशयोक्तीला वावच नाही. आत्मचरित्रांत

---

(१) माझ्या आठवणी व अनुभव - विठ्ठल रामजी शिंदे.
प्रस्तावना लेखक .. डॉ. वि.भि.कोल्ते.. प्रस्तावना पृष्ठ १

अतिशयोक्ति आणणे म्हणजे सत्याच्या गळ्याला दिवसा ढवळ्या नख लावण्या सारखे आहे. यास्तव आत्मचरित्रकाराने वर्णन अगदी काटेकोरपणाने करावें. असें करतांना वाजवीपेक्षा जास्त विनय धारण करावा आणि स्वतःच्या गुणांचें वर्णन करू नये असें कोणीही म्हणणार नाही. आत्मचरित्रकाराने (१) " प्रामाणिकपणे स्वत.चे गुण सांगितले तर त्याला आत्मश्लाघा म्हणणाऱ्यांचें तोंड कोणी धरू शकत नाही. स्वतःचें गुणवर्णन हें आंबरसांत टाकलेल्या मिरपुडीसारखे आहे. तें योग्य प्रमाणात असलें तर आत्मचरित्र चवदार होते, जरा जास्त झालें तर त्यास उग्र वास येऊं लागतो."

यास्तव आत्मवृत्ताच्या वर्णनांत अतिशयोक्ति येणार नाही याची खबरदारी घ्यावी. पण वाचलेल्या आत्मचरित्रांच्या समीक्षणावरून असें दिसून येतें की ज्याप्रमाणें बुडत्याचा पाय खोलांत जातो त्या प्रमाणे आत्मप्रौढीला बळी पडलेला मनुष्य आपल्या आत्मचरित्रांत आपपरभार आणि अतिशयोक्ति यांना आपोआपच स्थान देतो. त्यामुळे असलें आत्मचरित्र निरस होते. त्याचा वाचकांना कंटाळा येतो. याचें उदाहरण म्हणून श्रीमती कमलाबाई देशपांडे यांच्या आत्मचरित्राकडे, बोट दाखविता येईल. (२) प्रो.अ.ना.देशपांडे म्हणतात " स्मरण साखळीच्या कांहीशा काव्यमय स्वरूपाच्या ~~स्वरूपाच्या~~ प्रारंभिक भागाचें परिशीलन मनास मोठें प्रसन्न करणारे व आल्हाद देणारे आहे. पण पुढचीं पानें चाळीत जावे तों तों असें आढळून येतें की त्यांत उबग न येणें अशक्य व्हावें, इतका आत्मसमर्थनपर वृत्तीचा किळसवाणा अतिरेक झालेला आहे. एक्तर ज्या संस्थेंत आपण नोकरी करतो तेथील कारभाराविरुद्ध तक्रारी करण्याकरिता आपल्या आत्मचरित्राचा उपयोग करणे हें शिष्टाचारास आणि सुसंस्कृतपणाच्या मर्यादेस सोडून आहे. पुन्हा ज्यांची बाजू वाचकांना ऐकायला

---

(१) चरित्र आत्मचरित्र आणि टीका प्रो.अ.म.जोशी, डा.प्र.न.माचवे, पृष्ठ ११५

(२) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग दुसरा (१९५८) प्रो. अ.ना.देशपांडे .. पृष्ठ ६७३

मिळणे शक्य नाही अशा ज्या व्यक्तीबद्दल कमलाबाईंनी कडवटपणे लिहिले आहे त्यांच्याबाबतही या आत्मचरित्रामुळे अन्याय झालेला आहे. बरे, कमलाबाईंनी कठोर आत्मपरीक्षण करून आपल्या गुणदोषांचें निष्ठुर विवेचन केलेलें आहे काय, म्हणून पाहायला जावें तरी वाचकांच्या पदरी निराशाच पडणार आहे ! आत्मचरित्र कसें नसावें याचें एक प्रात्यक्षिक म्हणून ' स्मरण साखळी ' पुष्कळच उपयोगी आहे. "

हे प्रो. अ.ना.देशपांडे यांचे स्मरण साखळी विषयींचें मत पूर्णपणें खरे आहे यांत वाद नाही. ' स्मरण साखळी' तील पुढील उतारा कसा अतिशयोक्तिपूर्ण आहे तो पाहा. त्या लिहितात (१)" पस्तीस साला पासून दोन वर्षे पर्यंत कु. कमलाबाई कौशांबी या लेक्चरर व रेक्टर होत्या. वय लहान, अनुभव नाही, स्वभाव संकोचित आणि भित्रा. एम.ए. झाल्या म्हणून नोकरी करण्यास आल्या. रेक्टरच्या कामाला सुरुवात केल्या नंतर दोन दिवसांनी मजकडे आल्या व भीतभीत म्हणू लागल्या " मला खिडक्यांना पडदे लावावयाचे आहेत कोण लावून देईल ?" मी म्हटलें "कमलाबाई तुम्ही रेक्टर म्हणजे वसतीगृहावरच्या सर्वाधिकारी. सर्व गडी माणसे तुमचीच आहेत. कोणालाही हाक मारून काम करून घ्या." वर्गांत गेल्या म्हणजे शिकवीत ठीक, पण कॉमनरूममध्ये किती प्राध्यापकांशी त्या दोन वाक्यें बोलल्या असतील शंकाच आहे.

त्या जाण्यास निघाल्या तेव्हा कॉमनरूममध्यें त्यांचेसाठी लहानशी चहापार्टी दिली. पार्टी संपल्यावर प्राध्यापक म्हणाले "आपण आज कशाला चहा घेतो आहोत?" तेव्हा सांगावें लागलें की कडेच्या खुर्चीवर काही न बोलता बसल्या आहेत ना, त्या आपल्यापैकी एक आहेत, दोन वर्षे त्या इथे होत्या व आता अमेरिकेस जात आहेत."

---

(१) स्मरण साखळी .. मनोहर ग्रंथमाला प्रकाशन ३१ वें ऑक्टोबर १९४३ कमलाबाई देशपांडे... पृष्ठ २९९,३००

पुढे पृष्ट ३५५ वर त्या प्रोफेसर आठवले यांच्याबद्दल लिहितात "आठवले हजर नाहीत हे पाहून राग येण्यास आणखी एक कारण होते. पुढच्या वर्षापासून सायन्स विषय बन्द करावा असे मागचे वर्षी ठरून प्रो. आठवल्यांना त्याप्रमाणे नोटीसही दिली होती. पण सिंडिकेटने वर्ष अखेर या प्रश्नाचा विचार केला व ठरविले की काम असो वा नसो आठवले यांची नेमणूक जून १९४१ पर्यंत आश्रमाशी केलेल्या करारा प्रमाणे आहे. तेव्हा नैतिक दृष्टया करार मोडणे बरे नाही. सायन्स विषय नसला तरी त्यांना जून १९४१ पर्यंत प्रोफेसर म्हणून ठेवून पगार द्यावा. सिंडिकेटने पैशाकडे न पाहता 'नैतिक दृष्टया योग्य' म्हणून ठरविले खरे पण प्रत्यक्ष काम चालविणाऱ्यांना त्या बद्दल रुखरुख लागलेली असावी. ठराव करते वेळी सिंडिकेटचे सभासद मला म्हणत "द्या हो त्यांना काहीतरी काम." मी म्हणे "अहो सायन्स बंद झाल्यावर त्यांना काम काय सांगू ? माझे तास कमी करून त्यांना काव्येद काव्य प्रकाश शिकवावयास देऊ? का कारकून कमी करून हिशेब लिहिण्यास बसवू ? त्यांना देण्याजोगे काम मजजवळ नाही ?कॉलेजपासून जवळ पांच मिनिटांचे वाटेवर त्यांचे खाजगी वर्कशाप आहे तेथे ते काम करीत व इकडचा पगार घेऊन तिकडे काम करीत, हे इतरांना बरें वाटत नसे, 'आठवले हजर नाहीत' यातील खोच तीच होती. आमचा पगार घेऊन काम करणारा एखादा मोठा सरकारकून तपासणीस येतो व हा पगार घेऊन काहीएक काम न करणारा प्रोफेसर मात्र अकरा ते चार कॉलेजवर त्यावेळी हजर नसतो म्हणजे काय!" म्हणूनच प्रोफेसर रामचंद्र कृष्ण लागू म्हणतात की अशात,हेंनै (१)कमलाबाई जेव्हा वादाच्या आड रानात शिरतात तेव्हा त्यांचा तोल त्यांना सावरता येत नाही. आणि त्या आपली स्वतःची आत्यंतिक

---

(१) दादोबा पांडुरंग। आत्मचरित्र-दादोबा पांडुरंग या ग्रंथात। आत्म चरित्र चरित्र आणि आठवणी' असा एक लेख प्रो.रामचंद्र कृष्ण लागू यांनी लिहिला आहे त्यातील उतारा.

तरफदारी करू लागतात. या त्यांच्या आत्मसमर्थनामुळे स्मरणसाखळीला चांगलेच गालबोट लागले आहे."

७ शालीनता असावी.

आत्मचरित्रांत आत्मप्रौढी, आपपरभाव आणि अतिशयोक्ति या गोष्टी नसाव्यात हें आपण आताच पाहिलें. तेव्हा असें वाटणें शक्य आहे की मग आत्मचरित्र लिहूच नये की काय कारण आत्मचरित्र लिहिण्यात अडचणी फार आहेत. परंतु या सर्व अडचणींवर मात करता येईल असाही एक उपाय आहे. त्याचें अवलंबन केल्याने या होऊ पाहणाऱ्या चुका आपोआप टळतात. जशी झाडाचीं पानें वाळल्यावर वाऱ्याबरोबर आपोआप खाली पडतात त्या प्रमाणे या उपायामुळे आत्मप्रौढी, आपपरभाव आणि अतिशयोक्ति या तिन्ही गोष्टी एकदम नाहीशा होतात. ~~तारेवरून~~ तारेवरून चालण्याची कसरत करणें ~~अवघड~~ अवघड खरें परंतु एकदा तोल साधला की तें काम अवघड वाटत नाही. या प्रमाणेच आत्मचरित्र काराजवळ शालीनता असेल तर त्याला या तिन्ही गोष्टींचा बाऊ वाटण्याचें कारण नाही.

आपल्या मराठी वाङ्मयात किंवा जगातील इतर कोणत्याही भाषेतील वाङ्मयात जी आत्मचरित्रें अमर झाली आहेत त्यात ही शालीनता प्रत्ययास येतेच येते. खरा ज्ञानी मनुष्य हा नम्र असतो. त्याच प्रमाणे मोठा आत्मचरित्रकारही शालीनतेनेच लिहितो. अरण्यातील अवघड वाटेतून जातांना वाघ लांडगे, खाचखळगे आणि काटेकुटे यांच्यामुळे बेजार न होता सहीसलामत पुढे जायचें असेल तर हातात मशाल किंवा आधुनिक भाषेतला शब्द योजायचा तर हातात एव्हररेडी बॅट्री पाहिजे. त्याप्रमाणे आत्मप्रौढी, आपपरभाव आणि अतिशयोक्ति यांना बळी पडायचे नसेल तर शालीनता पाहिजेच पाहिजे.

आतापर्यंत आत्मचरित्राचें जे परीक्षण आपण केले त्यावरून हाच मुद्दा प्रत्ययास येतो की शालीनतेशिवाय दुसरा मार्ग नाही. एवढे मोठे ज्ञानेश्वर ! पण त्यांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरीत विनय सर्वत्र भरलेला आहे. कोठेही आत्म प्रौढी नाही. आपल्या गुरूचें म्हणजे निवृत्तिनाथांचें त्यांना कधीही विस्मरण झालें नाही. एके ठिकाणी ते म्हणतात (१) " सर्व विद्येचे आश्रयस्थान जे आत्मरूप, गणेशाचें स्मरण तेच श्रीगुरुचे श्रीचरण होत. त्यास नमस्कार करू. ज्या श्रीगुरुंच्या स्मरणाने शब्दसृष्टी स्वाधीन होते म्हणजे शब्द मात्रावर प्रभुत्व येऊन, मनात स्फुरणारे विचार योग्य शब्दांनी स्पष्ट सांगण्याचें सामर्थ्य येते, व सकल विद्या जिव्हेवर येतात. वक्तृत्व आपल्या गोडपणाने अमृताला पलीकडे सर असें म्हणतें व नवरस हे वक्तृत्वातील शब्दांची सेवा करतात. निरनिराळ्या तत्वांतील फरक दाखवून अभिप्रायांची स्पष्टता करणारी जी मार्मिकपण, ती सर्वच्या सर्वच आपले स्वाधीन होते. जेव्हा हृदय श्रीगुरुंचे पाय धरून राहते तेव्हा ज्ञानाला एवढे दैव प्राप्त होते. त्या श्रीगुरुच्या चरणांना आता नमस्कार करून मी, ज्ञानेश्वर ग्रंथ सांगणें पुढे चालू करतो.

तुकाराम महाराजांची नम्रता तर सुप्रसिद्धच आहे. त्यांचा पुढील अभंग पाहा....

(२) " ज्ञानियांचा गुरु राजा महाराव ।
म्हणती ज्ञानदेव ऐसे तुम्हा ।। १ ।।

---

(१) सार्थ ज्ञानेश्वरी (१९५३) संपादक .. शंकर वामन दांडेकर अध्याय १३ वा ओव्या १ ते ६

(२) श्री तुकाराम बावांच्या अभंगांची गाथा इ.स. १९५५ पृष्ठ ३९९, अभंग २३३३

मज पामरा हें काय थोरपण ।
पायीचीं वाहाण पायीं बरी ॥२॥

ब्रम्हादिक जेथें तुम्हा वोळगणें ।
इतर तुळणें काय पुरें ॥३॥

तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली ।
म्हणोनि ठेविली पायी डोई ॥४॥ "

महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांनी आपल्या आत्मचरित्रात अशीच शालीनता दाखविली आहे. मी मोठा राष्ट्रोध्दारक म्हणून माझे आत्मचरित्रही उत्कृष्टच असणार असा अहंभाव त्यांना झालेला नाही. म्हणूनच प्रो. जोशी आणि डॉ. माचवे म्हणतात ..

(१)" महात्मा गांधींनी आपले ' सत्याचे प्रयोग ' लोकापुढे ठेवतांना असली कथा जर मला तटस्थपणे निरभिमान वृत्तीने लिहिता आली तर त्यापासून तसलेच प्रयोग करणाऱ्या इतर लोकांना थोडीबहुत सामुग्री मिळू शकेल अशी आशा व्यक्त केली आहे. हे उद्गार किती शालीनतेचे आहेत ! यात ' पहा मी कसे प्रयोग करुन दाखविले !' अशी प्रौढी मिरविण्याची मुळीच इच्छा दिसत नाही.

यातच महात्मा गांधींच्या आत्मचरित्राचा थोरपणा आहे. कोठेही फाजील आत्मसमर्थन सापडावयाचें नाही, फाजील विनय दिसावयाचा नाही व आत्मप्रौढीचा तर गंधही मिळावयाचा नाही. गांधींच्या ' सत्याचे प्रयोग ' इतके महान आत्मचरित्र कोणत्याही भाषेत अद्यापी माझ्या वाचण्यात आले नाही."

---

१ चरित्र आत्मचरित्र टीका- प्रो. अ.म.जोशी, डॉ. प्र.व.माचवे, पृष्ट ११५ आणि १२७

गांधीजी आपल्या आत्मचरित्राविषयी स्वतःच म्हणतात (१)
"माझ्या मित्राच्या बोलण्याचा माझ्यावर थोडाफार परिणाम झाला. परंतु मला आत्मकथा कोठे लिहावयाची आहे ? मला तर आत्मकथेच्या निमित्ताने मी जे सत्याचे अनेक प्रयोग केले त्यांची चर्चा करावयाची आहे. हे मात्र खरे की यात माझे जीवन ओतप्रोत भरलेले असल्याने ती एक आत्मकथा होईल. परंतु प्रत्येक पानापानात माझ्या सत्याच्या प्रयोगांचेच चित्रण उमटेल तर मी आत्मकथेला निर्दोष समजेल. हे सर्व प्रयोग एकत्र सांगितल्याने वाचकांचा फायदा होईल असे मला वाटते. हवे तर हा माझा मोह म्हणा. माझ्या राजनैतिक प्रयोगांना आज हिंदुस्थानातच नव्हे तर सर्व जगातील सुशिक्षित लोकही थोडेफार जाणत आहेत. परंतु याची किंमत माझ्या दृष्टीने कमी आहे. तसेच मला जी महात्मा पदवी प्राप्त झाली तिची किंमतही फारशी नाही. कारण या पदवीमुळे मला पुष्कळ वेळा दुःख झाले आहे. या पदवीमुळे मला गर्व झाला आहे असा एकही क्षण आठवत नाही.

ज्या आध्यात्मिक प्रयोगामुळे माझ्या ठिकाणी राजनैतिक शक्ति निर्माण झाली त्याचे वर्णन करण्याची मात्र माझी इच्छा आहे. या अध्यात्मिक प्रयोगामुळे कोणासही गर्व होऊ नये. उलट नम्रताच वाढावी. जो जो मी माझ्या संबंधी विचार करतो तो तो मी किती अल्प आहे याची मला जाणीव होत आहे. गेल्या तीस वर्षांपासून मी ज्याच्यासाठी एवढी धडपड करीत आलो आहे ती गोष्ट म्हणजे आत्मदर्शन ... ईश्वरसाक्षात्कार म्हणजेच मोक्ष होय. माझ्या सर्व क्रिया याचसाठी होत आहेत. माझे सर्व लेखनही याच दृष्टीने होत आहे. आणि मी राजकारणात पडलो तेही याच कार्याच्या आधीनतेमुळे.

---

(१) सत्याचे प्रयोग .. मोहनदास करमचंद गांधी
प्रस्तावना.

कदाचित ही माझी चूकही असेल पण माझी अशी धारणा आहे की जी गोष्ट एकाला शक्य आहे ती सर्वांना सुध्दा शक्य आहे. म्हणूनच माझे सत्याचे प्रयोग माझे एकट्याचेच नाहीत. या प्रयोगांना सर्वासमोर मांडल्याने यातील अध्यात्मिकता कमी होईल असें मला वाटत नाहीं. अशा काही गोष्टी असतात की त्यांना आत्माच जाणतो आणि त्या आत्म्यातच शांत होतात. अशा गोष्टींना प्रगट करणें हें माझ्या आवाक्या बाहेरचे आहे. परंतु एवढें मात्र खरें की या माझ्या प्रयोगात अध्यात्मिक अर्थात नैतिक, धर्म आणि नीति यांच्या विषयी चर्चा आहे. म्हणजे ज्या गोष्टी बालक, तरुण आणि वृध्द समजू शकतात अशा गोष्टींचा यात समावेश आहे. या गोष्टी जर मी निरभिमान होऊन तटस्थवृत्तीने लिहू शकलो तर माझ्याप्रमाणेच प्रयोग करणाऱ्या दुसऱ्या अनेकांना याचा थोडा बहुत उपयोग होऊ शकेल.

आता मी जीं प्रकरणें लिहिणार आहे त्यात वाचकांना थोडातरी माझा अहंभाव दृष्टीस पडला तर त्यांनी निश्चित समजावें की या माझ्या ' सत्याच्या प्रयोगात ' त्रुटी आहे आणि मी केलेलें वर्णन मृगजळाप्रमाणें आहे. मी नष्ट होवो परंतु सत्याचा विजय होवो. मजसारख्या अल्प आत्म्यासाठी सत्याला कमीपणा येऊ नये. म्हणूनच माझ्या प्रयोगांना कोणी प्रमाणभूत समजू नये. प्रत्येकाने माझ्या प्रयोगांना दृष्टांत रूप समजून आपले आपले प्रयोग करून पाहावेत अशी माझी नम्र प्रार्थना आहे. "

पुढे पृष्ट ५८५ वर गांधीजी म्हणतात " मी असे सतत समजत आलों आहे की दुसऱ्यांच्या मोठ्या दोषांना लहान समजून आपण त्यांच्याकडे तसेंच पहावें. आणि उलट आपल्या लहानसहान दोषांनाही आपण पर्वताप्रमाणें मोठे मानले पाहिजे. तरच आपल्याला आपल्या व दुसऱ्यांच्या दोघांची खरी माहिती होऊ शकेल. "

पदमभूषण डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांचे 'आत्मवृत्त' हेंही शालीनतेचें उत्तम उदाहरण आहे. ते लिहितात (१)" आई व बाबा ही उभयता धार्मिक वृत्तीची होती. बाबांनी गुरुपदेश घेतला होता. दररोज मनांतल्या मनांत गुरुंनी सांगितलेलें भजन म्हणावयाचें व नंतर निजावयाचे असा त्यांचा क्रम असे. आई पहाटेला दोन दोन घटका देवापुढे बसून देवाची गाणी गाई. जीवरून तिच्या स्वभावाची ओळख पटेल अशी एक गोष्ट येथें सांगण्या सारखी आहे.

माझ्या लग्नाच्या वेळी वधूगृही जावयाचे असतांना कांही पदार्थ बरोबर घेण्यास ती विसरली. त्यावेळी वधूच्या आजीने " तुम्ही एवढाल्या बायका ! या साध्यागोष्टी सुध्दा तुम्हाला कशा कळत नाहीत. वगैरे मर्मभेदक शब्दांनी सर्वासमक्ष तिला दुखविलें. आईनें उलट मर्मभेदक शब्द न बोलता एकदम स्वतःच्या श्रीमुखांत मारून घेतली व " माझी चूक झाली क्षमा करा ! " असे शब्द उच्चारले. सर्व बायका थक्क झाल्या व पुढील कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडला. वरमाईला अशारितीनें दुखविल्यावर त्याचा सूड घेतल्यावांचून किती बायका राहतील ? पण आईनें त्या लग्नांत किंवा नंतरही त्याबद्दल कोणालाही दुखविलें नाही. "

स्वतःच्या वर्तणुकीबद्दल ते लिहितात "एकदा एका पदवीधर शिक्षकांना लेडी सुपरिटेंडेंट यांनी खालच्या इयत्तावर काम दिलें. यामुळे आपला अपमान झाला अशी समजूत करून घेऊन ते ताठ्याने वर्ग शिकवायला गेले नाहीत. ही गोष्ट मजकडे आली. तेव्हा मी त्यांना बोलाविले व " तुमच्या वर्तनाबद्दल मी तुम्हाला बोलणार आहे याबद्दल क्षमा करा." असें म्हणून त्यांना प्रथम साष्टांग नमस्कार घातला, व नंतर " तुम्ही केलें तें बरें केलें नाही" वगैरे त्यांना सांगितलें. हा सर्व प्रकार लेडी सुपरिनटेंडेंट यांच्या समक्ष घडला."

---

(१) आत्मवृत्त धोंडो केशव कर्वे.

७

आत्मचरित्राचीं साधनें आणि सुरुवात.

प्रत्येक कलाकाराला कलाकृति निर्माण करण्यापूर्वी पुष्कळ गोष्टींची जुळवाजुळव करावी लागते. लेखक हाही एक कलावंतच असतो. त्यालाही लेखनासाठी तयारी करावी लागते. कारण तयारी शिवाय म्हणजे परिश्रमाशिवाय काही निर्माण होऊ शकत नाही. आत्मचरित्रकार हाही एक कलावंतच असतो यात शंका नाही. तेव्हा आत्मचरित्र लिहिण्यापूर्वी आपण कसकशी तयारी केली, कोणकोणत्या साधनांचा उपयोग केला आणि आत्मचरित्र लिहून पूर्ण कसें झालें याची थोडीफार चर्चा काही आत्मचरित्रकारांनी केली आहे. तेव्हां त्या साधनांचा येथे आता विचार करावयाचा आहे.

~~शेतक-याजवळ~~ शेतक-याजवळ जमीन, विहीरीचेपाणी, बैल, मोट, कुदळ, फावडे, बीबियाणे इत्यादि अनेक साधनांच्या बरोबरच शेती करण्याची उमेदही असते. हीं साधनें आणि त्या शेतक-याची उमेद यांच्यामुळेच शेतांत धान्य येतें. यांच्या अभावी धान्य येणार नाही. त्याचप्रमाणें आपलें गतायुष्य, त्यांत घडलेल्या घटना, त्यांची जंत्री, त्यातून निवडायचे प्रसंग, ते सांगण्यासाठी लेखकाच्या मनाचा दृढनिश्चय, आयुष्यांतील घटनांकडे तटस्थवृत्तीने पाहण्याची लेखकाची स्वत:ची तयारी, त्या घटनाबद्दल एखाद्या न्यायाधिशाप्रमाणे स्वत: द्यावयाचें मत, आपल्या हातून झालेल्या चुका जाहीररीतीने कबूल करण्याची तयारी, सहवासांत आलेल्या व्यक्तींच्या विषयी काय सांगायचें आणि तें सुद्धां किती सांगायचे याविषयी पाळावयाचें तारतम्य, आपण चुका कबूल केल्या तर लोक काय म्हणतील या विषयी वाटणारा बागुलबोवा, लैंगिक अनुभव सांगतांना

पाळावयाच्या मर्यादा अशा एक ना दोन हजारो गोष्टी विषयी विचार करून त्या आठवणींना सुबोध, सोप्या आणि सुंदर शब्दांत पकडून कागदावर उमटविणें म्हणजे आत्मचरित्रकाराने तयारी करणें होय.

म्हणून आत्मचरित्र लिहिणें हें जितकें सोपें आहे तितकेंच कठिणही आहे. आपल्या आयुष्यातील घटना प्रांजलपणे, निःपक्षपातीपणाने आणि शालीनतेने सांगायची तयारी असेल तर आत्मचरित्र लिहिणें सोपें आहे. कारण आत्मचरित्र काराला (१)" लिहिण्यासाठी नाटककादंबरीकाराप्रमाणें फारशी कल्पनाशक्तीची आवश्यकता नसते. शास्त्रीय ग्रंथाला आवश्यक असलेली तीव्र बुद्धिमत्ता व दीर्घ व्यासंग यांचीही त्याला आवश्यकता नाही किंवा चरित्र इतिहास यांना लागणारे परिश्रमही त्याला घ्यावे लागत नाहीत. उत्तम कलाकृति निर्माण करण्याकरिता लागणारी समरसता आत्मचरित्राच्या बाबतींत जितकी शक्य आहे तितकी दुसऱ्या कोणत्या प्रकारात आढळू शकेल ? आरशांत स्वतःचें प्रतिबिंब पाहण्यात मनुष्य जितका रंगतो तितका दुसऱ्याचे चित्र पाहण्यात तो रंगत नाही हा प्रत्येकाचा अनुभव आहे." म्हणूनच आत्मचरित्र लिहिणें म्हटलें तर सोपें नि म्हटलें तर कठीण असें आहे. कठीण अशासाठी की आपल्या घटनाकडे निःपक्षपातीपणाने पाहणें हेंच बहुधा पुष्कळांना जमत नाही.

१ रोजनिशीची आवश्यकता.

आता या ठिकाणी आत्मचरित्र लिहिण्याचीं साधनें कोणतीं या विषयी विचार करणें क्रमप्राप्त आहे. या दृष्टीने विचार करताकरता आत्मचरित्र लिहिण्याचें उत्तम साधन म्हणजे रोजनिशी लिहून ठेवणें हें होय. कारण रोजनिशी

---

(१) चरित्र आत्मचरित्र टीका .. प्रो.अ.म.जोशी, डॉ.प्र.ब.माचवे, पृष्ठ १०२

मुळे घडलेल्या घटनांची अगदी दिनांकासहित सुसंगत अशी माहिती सहजासहजी उपलब्ध होते. म्हणूनच आत्मचरित्र लिहिण्याचें रोजनिशी हें उत्तम साधन आहे. याच कारणास्तव साहित्यसम्राट न.चिं.केळकर म्हणतात (१) " मी रोजनिशी लिहिण्याची सवय ठेविली नाही याविषयी मात्र मला अतिशय वाईट वाटतें. कारण मी तशी ती ठेवली असती तर स्थानीकच काय पण समकालीन परप्रांतांतील अशा इतिहासाचीं काही साधनें माझ्या संग्रही राहिलीं असतीं. आणि आज या गतगोष्टी लिहितांना पुष्कळ गोष्टी आठवत नाहीत, कित्येकांचा काल विपर्यास होतो की काय अशी जी भीति मनाला वाटते ती वाटण्याचें कारण उरलें नसतें. वर्तमानपत्रें हा सार्वजनिक जीवनाचा एक रोजखर्डा असतो हें खरें. तथापि त्यांत ज्यांना सार्वजनिक रूप मोठया प्रमाणावर प्राप्त झालें अशा गोष्टींचाच उल्लेख असावयाचा. मग त्यांत माझा स्वतःचा संबंध कितीसा असणार ! आणि ज्यांत माझा उल्लेख आला अशीही नोंदींचीं मजकुराचीं कात्रणें मी फारशी काढून ठेवली नाहीत. पण वर्तमानपत्रांत ज्यांचा उल्लेख आलेला नाहीं अशा स्मरणांत ठेवण्यासारख्या व या ग्रंथांत मी नोंदू शकलो असतो अशा कितीतरी मनोरंजक व बोधप्रद हकीकती घडलेल्या आहेत. रोजनिशी ठेवण्याच्या आळसामुळे मी त्यांना मुकलों हें खास. "

पूर्वी रोजनिशी न ठेवल्यामुळे उद्योगरत्न श्री वि.रा.वेलणकर यांना म्हणावें लागलें कीं (२)"माझा कामाचा व्याप फार झाल्याने फार पूर्वीच्या आठवणी शोधून काढणें म्हणजे जमीन खोदून वस्तु प्राप्त करून घेण्यासारखें आहे."

उलट ल.रा.पांगारकर यांनी रोजनिशी ठेवली होती, म्हणून ते म्हणतात -

---

(१) गतगोष्टी न.चिं.केळकर पृष्ठ ३२

(२) मी कारखानदार कसा झालो .. श्री. वि.रा.वेलणकर प्रस्तावना.

(१) " रोजनिशी ठेवण्याचा छंद १८९४ साली लागला. गेल्या ४४ वर्षां पैकी सुमारे ४० वर्षांच्या रोजनिशा आज मजजवळ आहेत. चांगला विचार कोठे आढळला, सुचला किंवा ऐकला तर तो रोजनिशींत टिपून घ्यायचा, काही महत्त्वाचे प्रवास कोणाच्या गाठीभेटी संवाद यांची टाचणें ठेवायची अशी सवय मला लागली."

मराठी आत्मवृत्तांचें अवलोकन केल्यावर या रोजनिशी ठेवण्या बद्दल असें दिसतें की बहुतेकांनी रोजनिशी ठेवली नव्हती. असें असलें, तरी मराठींत लक्ष्मीबाई टिळक यांची ' स्मृतिचित्रें ' रमाबाई रानडे यांच्या ' आमच्या आयुष्यांतील आठवणी ' डॉक्टर धोंडो केशव कर्वे यांचें ' आत्मवृत्त ' दादोबा पांडुरंग यांचे ' दादोबा पांडुरंग ' आनंदीबाई कर्वे यांचें ' माझे पुराण ' इत्यादि काही आत्मचरित्रें उत्कृष्ट उतरलीं आहेत यात शंका नाही. या लेखक लेखिकांनी रोजनिशी ठेवली नव्हती. परंतु तेवढयामुळे त्यांची आत्मचरित्रें गौण होऊ शकत नाहीत. कारण .. ' रोजनिशी ' हें आत्मचरित्र लिहिण्याचें साधन आहे. ल.रा.पांगारकर यांनी चाळीस वर्षे लिहिलेल्या रोजनिशींचा 'चरित्रचंद्र ' लिहिण्यासाठी उपयोग केला. पण तेवढयाने त्यांचें आत्मचरित्र पहिल्या पंक्तींत असण्या सारखे आहे असें हमखास म्हणता येणार नाही. चरित्रचन्द्र या आत्म चरित्रांत पांगारकरांची भाषाशैली रसाळ आणि ओघवती असल्याचा पुन्हा पुन्हा प्रत्यय येतो आणि त्यामुळेंच त्यांचें आत्मचरित्र वाचनीय झालें आहे.

म्हणजे मुद्दा असा कीं आत्मचरित्र लिहिण्यासाठीं ' रोजनिशी ' हें एक उत्तम साधन आहे यात शंकाच नाही. परंतु केवळ त्याच्याच

---

(१) चरित्रचन्द्र ल. रा. पांगारकर,

पृष्ठ १२.

जोरावर उत्कृष्ट आत्मचरित्र लिहिताच येईल असें म्हणता येणार नाही. कारण आत्मचरित्राचा प्राण म्हणजे सत्य सांगणे. तेंच जर नसेल तर बाकीच्या साज शृंगारांची काहीच मातब्बरी नाही. पण म्हणून रोजनिशीचें काहीच महत्त्व नाही असें म्हणता येणार नाही.

धर्मानंद कोसंबी हे काही दिवस टिपण वही ठेवीत असत. ते म्हणतात (१) " ता. २२ जून १८९९ या दिवसापासून मी रोजनिशी एका जुन्या वहीवर लिहिली आहे. याच वहीवर १८९८ ते १८९९ सालची काही टिपणे आहेत. सात वर्षांत परत घरी आल्यावर ही वही जुन्या कागदपत्रात पडलेली मला सापडली.

सध्या शिल्लक राहिलेल्या जुन्या वहीतील माझी समग्र रोजनिशी किंवा लांबलांब टिपणें देऊन वाचकास कंटाळा आणण्याची इच्छा नाही. पण गोंवे सोडून पुण्यास येण्यापूर्वी माझ्या विचारांची दिशा कोणती होती हे माझ्याशी ज्यांचा निकट संबंध नाही अशा वाचकास ठाऊक असणे अत्यंत इष्ट आहे. मी कंटाळून घर सोडून निघालो व केवळ दैवबळाने पुढे आलो अशी कित्येकांची समजूत आहे. दुसऱ्या कित्येकांना गोंवे सोडल्यावर माझी धार्मिक आणि सामाजिक मते बदलली असें वाटतें. या व दुसऱ्या काही गैर समजुती नष्ट करण्यासाठी माझ्या टिपणवहींतील एकदोन उतारे येथे देतो."

२ पत्रें, कात्रणें इत्यादि साधनें.

रोजनिशीच्या उपयुक्तते विषयी जें सांगितलें तेंच पत्रें आणि कात्रणें इत्यादिंच्या उपयुक्ततेविषयी सांगता येण्यासारखें आहे. आपण लिहिलेल्या पत्रांच्या नकला आपल्याजवळ असल्या तर त्या त्या वेळी आपल्या स्वभावा बद्दल आपणास पुष्कळच माहिती उपलब्ध होईल यात संशय नाही.

---

(१) निवेदन   धर्मानंद कोसंबी .. पृष्ठ २४

आपल्याकडे चरित्र आणि आत्मचरित्र वाङ्‌मयाबद्दल बऱ्याच काळ पर्यंत उदासीनवृत्ति असल्यामुळे अशा साधनाकडे कोणी लक्ष दिलें नाही. आतां वाङ्‌मयाचे आणि त्यांत आत्मचरित्र वाङ्‌मयाचेंही महत्त्व समाजाला हळूहळू वाटू लागलें आहे. या पुढील काळांत समाज जसजसा जास्त जास्त सुशिक्षित होत जाईल तसतसें आत्मचरित्राचें महत्त्व लोकांना अधिकाधिक वाटू लागेल. आणि एकदा आत्मचरित्राचे महत्त्व समजलें म्हणजे मग ज्यांना आत्मचरित्र लिहिता येणें शक्य आहे असे लोक आपण वेळोवेळी लिहित असलेलीं पत्रें जपून ठेवतील. कारण पत्रांतून आपल्याला आपला स्वभाव पाहता येतो. आरशात जसे आपण आपलें प्रतिबिंब पाहतों त्याप्रमाणें आपण लिहिलेल्या पत्रांतूनही आपल्या स्वभावाच्या छटा व्यक्त होतात हें सांगायला नको. म्हणूनच पत्रांचे महत्त्व आहे.

ऐतिहासिक पत्रांविषयी बोलतांना रियासतकार गो.स.सरदेसाई म्हणतात की (१) " या पत्रांत अनेक ऐतिहासिक व्यक्तींचीं स्वभावचित्रें व घडामोडी पाहावयास मिळतात. पूर्वीचे व्यवहार व रीतरिवाज समजतात. निरनिराळ्या लेखकांची भाषाशैली कळते. नवीन विचार परिचित होतात. अशी एकंदरीत या पत्रांनी वाचकांच्या ज्ञानांत पुष्कळच भर पडते. सारांश मराठशाहीचे अंतःस्वरूप व बाह्य व्याप या दोन्ही गोष्टी या पत्रांच्या व्दारा वाचकांच्या मनावर अंशतः ठसतील तर इतिहास शिकण्याचा उद्देश पुष्कळसा सफल होईल. "

तेव्हां या ऐतिहासिक पत्रावरून जर त्या त्या व्यक्तीच्या स्वभावावर थोडातरी प्रकाश पडतो तर आपण लिहिलेल्या पत्रावरून आपल्या स्वभावाची पारख होण्यास आपणास मदत होईल, हें सांगणें नकोच. म्हणूनच ' पत्रें व टाचणें ' यांचें महत्त्व आहे यांत संशय नाही. यास्तव ज्या व्यक्तीला आत्मचरित्र लिहावयाचें आहे आणि अशी इच्छा आता समाजातल्या सर्व

---

(१) ऐतिहासिक पत्र बोध ... गो.स.सरदेसाई.
प्रस्तावना.

क्षेत्रांतील व सर्व थरांतील लोकांना झाली पाहिजे .. त्या व्यक्तीने आपण लिहिलेलीं पत्रें, टाचणें यांचे महत्त्व ओळखावें. म्हणजे पुढे जेव्हां त्यांना आत्मचरित्र लिहावेंसें वाटेल तेव्हां पत्रें व टाचणें यांचे एक उत्कृष्ट साधन अनायासें उपलब्ध होईल आणि आत्मचरित्र लिहिण्यास त्यांना उमेद येईल.

२

विद्वत्तेची ~~आवश्यकता~~ आवश्यकता आहे की नाही ?

आता ज्याला आत्मचरित्र लिहावयाचें आहे तो विद्वान् असावा की नसावा ? अर्थात् असा प्रश्न विचारणें हास्यास्पद आहे. कारण मनुष्य ज्ञानी असल्याशिवाय त्याला आत्मचरित्र कसें लिहिता येईल ? परंतु हें म्हणणें मान्य करूनही मराठींतील आत्मचरित्रांच्या अवलोकनावरून असें दिसतें की मनुष्य शिकला सवरला असेल पण अहंभावी असेल तर त्याने आत्मचरित्र न लिहिलेलें बरें. उलट थोडें फार लिहिता येणाऱ्या स्त्रियांनी लिहिलेलीं आत्मचरित्रें अक्षर वाङ्मयांत गणलीं जाणारीं आहेत. लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांची सर्वांनीच अगदी मुक्तकंठाने स्तुति केली आहे. अर्थात् 'स्मृतिचित्रें' आहेतच त्या मोलाचीं. परंतु लक्ष्मीबाईंच्या विद्वत्तेकडे पहावें तर त्या लहानपणी फारशा शिकल्यासवरलेल्या नव्हत्या. मग त्यांना एवढें अतुलनीय आत्मचरित्र कां लिहिता आलें ?

याचें कारण अगदी उघड आहे. तें म्हणजे लक्ष्मीबाईंना लागलेली सत्य सांगण्याची तळमळ, स्वतःच्या गुणदोषांकडे तटस्थवृत्तीने आणि एखाद्या न्यायाधिशाप्रमाणे न्यायनिवाडा करण्याचीं सवय, त्यांच्या ठिकाणी उपजत असलेली शालीनता आणि सरळ सोप्या आणि घरगुती भाषेची गोड गुंफण. यामुळे 'स्मृतिचित्रें' कोणत्याही पानावर वाचायला घेतलीं तरी कंटाळा म्हणून येत नाही. वाचकाच्या मनःचक्षू समोर ते ते प्रसंग आपोआप उभे राहतात आणि वाचक लक्ष्मीबाईंच्या जीवनाशी एकदम एकरूप होऊन जातो.

त्या जें सांगतात तें अगदी अंतःकरणापासून आणि प्रांजळपणें सांगतात याचा पुन्हा पुन्हा प्रत्यय येतो. म्हणूनच त्यांच्या स्मृतिचित्रांची सर दुसऱ्या आत्म चरित्राला येणें मुष्कील.

या उलट श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें 'आत्मवृत्त' किंवा कमलाबाई देशपांडे यांची 'स्मरणसाखळी' हीं आत्मचरित्रें मोठ्या विद्वानांनीं लिहिलीं आहेत. कोल्हटकर नाटककार म्हणून प्रसिद्ध तर कमलाबाई उत्तम शिक्षिका म्हणून सुपरिचित होत्या. परंतु त्यांच्या आत्मचरित्रांना अहंभावाचा नि अतिशयोक्तीचा दर्प येतो. म्हणून टीकाकारांचें म्हणणें असे कीं त्यांनीं आत्मचरित्र लिहिलें नसतें तर बरें झालें असतें.

मग यावरून असा निष्कर्ष काढावा काय की विद्वत्ता ही शालीनतेला बाधक असते? परंतु तसें म्हणता येत नाही. कारण महात्मा मोहनदास करमचंद गांधी किंवा डॉक्टर धोंडो केशव कर्वे यांनी आपापल्या आत्मचरित्रांत दाखविलेली नम्रता खरोखर त्यांच्या मोठेपणाची द्योतक आहे. वास्तव आपण एवढेंच म्हणू की मनुष्य ज्ञानी असून नम्र असेल तर आत्मप्रौढी केव्हांही वरचढ करणार नाही, आणि त्याच्या आत्मचरित्राला अहंभावाचा दर्प लागणार नाही. उलट तो ज्ञानी असून घमेंडखोर असेल तर त्याचें आत्मचरित्र उत्कृष्ट उतरणें शक्य नाही. सांगायचा मुद्दा असा की विद्वत्ता ही आत्मचरित्रकाराला बाधक ठरणारी आहे असें नाही आणि ज्ञानी नसणारी माणसे आत्मचरित्र लिहू शकणार नाहीत असेंही नाही. आत्मचरित्र काराच्या ठिकाणी सत्याला चिकटून राहण्याची वृत्ति, आणि आयुष्यातील घटना सांगण्याची तळमळ असेल तर सोपी भाषा सुचणें अवघड नाही.

४ आत्मचरित्राची सुरुवात

आता आत्मचरित्राला सुरुवात कोठून करावी याविषयी विवेचन करू. आत्मचरित्रकाराला पूर्वजाविषयी, आपल्या ~~जन्माविषयी~~ जन्माविषयी आणि अगदी

लहानपणच्या माहितीविषयी दुसऱ्यांच्या सांगण्यावरच अवलंबून राहावे लागतें यांत संशय नाही. पुढे समजायला लागल्यापासून मग मात्र त्याचे अनुभव सांगतांना त्याला स्वतःच्या स्मरणशक्तीवर विसंबून राहावें लागतें.

म्हणूनच आत्मचरित्र सांगण्याचा धोपट मार्ग म्हणजे प्रथम पूर्वजांची, आईवडिलांची आणि आपल्या जन्माची माहिती सांगून आत्मचरित्राला सुरुवात करणें हा होय. अशीच सुरुवात बहुतेक आत्मचरित्रकारांनी केलेली आहे. या उलट आयुष्यातील मधलीच एखादी घटना सांगून वाचकांचें अवधान नाट्यमय पद्धतीने आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न चिंतामण गणेश कोल्हटकर यांनी 'बहुरूपी' या आत्मचरित्रांत केला आहे. ते स्वतः मात्र माझे स्वतःचें या ग्रंथात काही नाही असें म्हणतात.

अशा तऱ्हेने आत्मचरित्राला सुरुवात आयुष्यातील कोणत्याही घटनेने करायला हरकत नाही. कारण चिंतामण गणेश कोल्हटकरांनी जरी अशा तऱ्हेनें नाट्यमय पद्धतीने आत्मचरित्र सांगायला सुरुवात केली तरी तें आत्मचरित्र उत्कृष्ट उतरलें आहे असें म्हणता येणार नाही. याविषयी 'आधुनिक आत्मचरित्रांचा परिचय' या ठिकाणी अधिक ऊहापोह करण्यात आला आहे.

१ आठवणी आणि आत्मवृत्त.

रमाबाई रानडे यांनी न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या जीवनाविषयी आणि त्यांच्या अनुषंगाने स्वतःविषयी जी माहिती सांगितली आहे तिला 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' असें नांव दिलें आहे. या आठवणी मोठ्या मनोरम आहेत. या आठवणी म्हणजे आत्मचरित्रच होय. या आठवणींबद्दल नामदार गोपाळ कृष्ण गोखले लिहितात (१) " हा ग्रंथ

(१) आमच्या आयुष्यांतील आठवणी ..रमाबाई रानडे, प्रस्तावना लेखक गोपाळ कृष्ण गोखले.

लिहिण्याचें श्री वहिनीबाईंनी मनांत आणलें व हातीं घेतलेलें काम तडीसही नेलें हें महाराष्ट्राचें मोठें भाग्य समजलें पाहिजे. पत्नीनें आपल्या पतीबद्दल अशा तऱ्हेने लिहिलेला हा पहिलाच ग्रंथ हिंदुस्थानांत आहे असें वाटतें व तो वहिनीबाईंनी लिहिला हें फार योग्य झालें. कारण हल्लीच्या काळांत आपल्या इकडील स्त्रीयांत श्री वहिनीबाईंची योग्यता फार मोठी आहे. आपल्या वयाचीं सत्तावीस वर्षे ज्यांनी त्या विभूतीबरोबर त्यांची सहधर्मचारिणी या नात्यानें 'सावली' प्रमाणे घालविलीं, ज्यांच्या अंगचें नैसर्गिक तेज शिक्षणाने व अतिथोर सहवासाने अनेक पटींनी वृद्धिंगत झालें व ज्यांचें मन रावसाहेबांच्या भक्तींत कायमचें गढून राहिलें आहे, त्यांनी आपल्या दिगंतकीर्ति पतीच्या स्वभावाचें व आयुष्यक्रमाचें काढलेलें चित्र आपणास पहावयास मिळाल्याबद्दल महाराष्ट्रांतील लोकांस अभिमान व समाधान वाटणें साहजिक आहे. "

या नामदार गोखल्यांच्या म्हणण्याप्रमाणें 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' बद्दल आपणास अभिमान वाटतो यांत तिळमात्र शंका नाही. तेव्हां आयुष्यांतील आठवणी सांगणें म्हणजे आत्मचरित्रच सांगणें होय. कारण आठवणींच्या साहाय्याने त्या व्यक्तीच्या स्वभावाची वाचकास ओळख होऊं शकते.

एक गोष्ट मात्र येथें मुद्दाम नमूद करावीशी वाटते ती ही की रमाबाई रानडे यांच्या ऐवजी दुसऱ्या कोणी व्यक्तीने न्यायमूर्ति रानडे यांच्या आठवणी सांगायचें योजिलें असतें तर त्याला त्या इतक्या सरसपणें सांगता आल्या नसत्या. म्हणूनच नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी रमाबाईंनी 'आपल्या वयाचीं सत्तावीस वर्षे सहधर्मचारिणी या नात्यानें 'सावली' प्रमाणें घालविलीं'

असें म्हटलें आहे. अगदी निकटवर्ती सहवास घडलेली व्यक्तीच अशा आठवणी सांगू शकेल. कारण त्यात सत्याची बैठक असू शकेल. ही गोष्ट तिऱ्हाईताला जमणें शक्य नाही. तो अंदाजाअंदाजाने सांगण्याचा प्रयत्न करील. त्यामुळे सत्याचा पाठपुरावा होणें शक्य नाही.

रमाबाई रानडे यांच्या प्रमाणेंच श्रीमती लीलाबाई पटवर्धन यांनी 'आमची अकरा वर्षे' या नांवाचें आत्मचरित्र लिहिलें आहे. तसेंच अगदी अलीकडे श्रीमती रमाबाई केदार यांनी 'वेचलेले मणी' या नावाचें आत्मचरित्र लिहिलें आहे. या दोन आत्मचरित्रांतून कविवर्य माधव ज्यूलियन आणि नानासाहेब केदार यांच्या जीवनाविषयी सांगितलेली माहिती उल्लेखनीय आहे.

६ याला आत्मचरित्र म्हणावें की नाही ?

आपल्या आयुष्यातील आठवणी आपणच सांगितल्या किंवा पतिपत्नींनी एकमेकांच्या आठवणी सांगितल्या आणि त्यांत त्या व्यक्तीचें स्वभावचित्र उमटलेलें असेल तर त्याला आत्मचरित्र म्हणायला हरकत नाही हें आपण आताच पाहिलें. परंतु मराठींत असे काही ग्रंथ आहेत की त्यांना आत्मचरित्रांच्या मालिकेंत ठेवावें किंवा नाही या विषयी निश्चित मत ठरविणें अगत्याचें आहे. उदाहरणार्थ समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचें 'डोंगरीच्या तुरुंगातील १०१ दिवस' नाटककार श्री.भा.वि.वरेरकर यांचे 'माझा नाटकी संसार' प्रोफेसर ना.सी.फडके यांचे 'माझ्या साहित्य सेवेंतील स्मृति' किंवा 'असी व्याख्यानें असी नाटकें' श्री व्यंकटेश माडगूळकर यांचे 'घरदार' किंवा श्री. गो.नी.दांडेकर यांचे 'कुणा एकाची भ्रमणगाथा' किंवा प्रोफेसर ना.सी.फडके हे अगदी अलीकडे सांगत असलेल्या 'नादलुब्धाच्या आठवणी' इत्यादि ग्रंथांना किंवा अशा तऱ्हेच्या इतर

ग्रंथांना आत्मचरित्राच्या यादींत ठेवावें की नाही !

परंतु या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी आत्मचरित्र म्हणजे काय हें जर आपल्या ध्यानात आलें असेल तर या आणि अशा इतर पुस्तकांना आत्मचरित्राचाच एक भाग म्हणून संबोधण्यास हरकत नसावी. कारण लेखकाचें अंतरंगदर्शन जर अशामुळे होत असेल तर आत्मचरित्रांत समावेश करणें अगत्याचें आहे. कधीकधी तर असेंही घडतें की आत्मचरित्रांत त्या व्यक्तीच्या स्वभावाचे सर्व पैलू पाहायला मिळतातच असें नाही. उलट लोकांच्या विषयी माहिती सांगता सांगता लेखक स्वतःविषयी जी माहिती सहजासहजी सांगतो त्यामुळे लेखकाच्या स्वभावातील बारिकसारिक कंगोरेही आपणाला कसे पाहयला सापडतात याचा पुरावा म्हणून 'नादलुब्धाच्या आठवणी' कडे बोट दाखविता येईल. प्रोफेसर ना.सी.फडके स्वतःच्या स्वभावाविषयी नि आवडीनिवडी विषयी किती सहजासहजी माहिती सांगतात पाहा.

(१) " संगीताच्या आणि नाटकांच्या या षोकाचा माझ्या वागण्यावर आणि आवडीनिवडीवर परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. वाईट अर्थानें मी 'बिघडलों' असे नव्हे. परंतु कपड्यालत्त्याचा छाकटेपणा माझ्या अंगी आला खरा. माझ्या षोकामुळे ज्यांचा कमी अधिक सहवास मला घडला त्यांच्या सवयी आणि रीतीरिवाज मी उचलले. केसांची झुलपं वाढवावी, निरनिराळ्या रंगांच्या उंची फरच्या टोप्या घालाव्या, त्या देखील तिरप्या घालाव्या, अगदी तलम विलायती मलमलीचें धोतर वापरावें, अन तें सुद्धा नाटकी पद्धतीनें नेसावें, अंगावर शेरवानी सारखा बंद कॉलरचा लांब कोट चढवावा, पायांत छाकटे पंप शू घालावे असे षोक मी करू लागलो. न्यू पूना कॉलेज (आताचे सर परशुरामभाऊ कॉलेज) आम्ही नुकतेंच काढले होते. त्यांत मी प्रोफेसर

---

(१) नादलुब्धाच्या आठवणी क्रमांक २ गुंडोपंत वालावलकर
प्रोफेसर ना.सी.फडके, रविवारची लोकसत्ता दिनांक २६.६.१९६० पृष्ठ ७

झालों होतों. कॉलेजात जातांना मी सूटबूट घालीत होतो. आणि ल्हानमोठ्या व्याख्यानांच्या वेळेस जरीकाठी शुभ्र रुमाल आणि उपरणें असा पोषाख करीत असे. परंतु या व्यतिरिक्त इतर ठिकाणी व प्रसंगी ज्यांनी मला पाहिलें त्यांना हा कुणीतरी नाटकी छाकटा आहे असेंच वाटलें असतें. लोकांना तसें वाटण्या सारखें आपण वागतो यातच मला आनंद आणि अभिमान वाटे. इतका मी नाटकांच्या आणि संगीताच्या षोकांत व्हात चाललों होतो."

या वर्णनाकरून प्रोफेसर फडके यांच्या स्वभावातील आणि वागणुकीतील कितीतरी बारिकसारिक गोष्टी वाचकांना सहजासहजी आकलन होतात. म्हणून यांनाही आत्मचरित्राचाच एक भाग असें म्हणायला प्रत्यवाय नसावा.

आता कोणी म्हणेल की मग प्रत्येक लेखकाचें प्रत्येक लिखाण हेंही आत्मचरित्रांतच समाविष्ट करावयाचें की काय ? तर तसें आम्हाला म्हणावयाचें नाही. रबर ताणण्यालाही मर्यादा असते, नाहीतर तें तुटून पडतें. ज्या ज्या लिखाणांतून लेखकाच्या स्वभावाची वाचकांना ओळख होईल तो तो भाग तेवढ्या पुरता आत्मचरित्राचाच एक भाग आहे एवढेंच आम्हाला म्हणावयाचें आहे. बाकीचा भाग आत्मचरित्र विषयक नाही असें म्हणावें म्हणजे झालें.

७. काय सांगावें आणि काय सांगू नये.

आत्मचरित्रकाराने स्वतः विषयीच सांगावें हें ठरल्यावर काय सांगावें आणि काय सांगू नये हेंही त्याने निश्चित करावें. आपल्या स्वभावाचें चित्र हुबेहूब रंगविण्यासाठी ज्या ज्या घटनांची माहिती आवश्यक आहे ती अवश्य सांगावी. पण जी माहिती देण्यात काही हशील नाही ती सांगू नये. आता हें त्याने कसें ठरवावें ? तर तारतम्य पाहून ठरवावें.

कारण ज्याप्रमाणें समर्थ रामदास स्वामी म्हणतात की 'प्रसंग पाहोन वर्तावें' त्याप्रमाणें जेवढें सांगायचें आवश्यक आहे तेवढेंच सांगावें.

आत्मचरित्रकाराने आपल्याच जीवनाचें चित्र वाचकासमोर मांडायचें हें एकदा निश्चित केलें म्हणजे मग काय सांगावें आणि काय सांगू नये अशी अडचण त्याला पडणार नाही. आगबोट किनाऱ्याहून सोडण्यापूर्वीच कोठे जावयाचें आहे हें कप्तानाला निश्चित माहीत असलेंच पाहिजे. तसेंच आत्मचरित्र लिहिणाराला प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी कोणकोणत्या घटना सांगावयाच्या हें नक्की ठाऊक असलें पाहिजे.

या बाबत प्रो. ना.सी.फडके यांचे विचार मोलाचे आहेत. ते म्हणतात (१)" मोठ्या व्यक्तीच्या खाजगी गोष्टी आपल्याला कळाव्यात असें लोकांना वाटणें कितीही साहजिक असले तरी त्यांचे लाड आपण किती प्रमाणात पुरवायचे याचा विवेक करायची जबाबदारी आत्मचरित्र लिहिणाऱ्यानें ओळखली पाहिजे. कारण लोकांची जिज्ञासा हा जसा आत्मचरित्राचा आधार तव्दतच ज्या गोष्टी सांगितल्यानें लोकांचें थोडेतरी हित होईल तेवढ्याच गोष्टी सांगणं हें आत्मचरित्रावरचें ओघानेंच प्राप्त होणार नियंत्रण ! आत्मचरित्राच्या लेखकानें ढोंगीपणा करू नये हें तर खरेंच. तसें त्यानें केल्यास कोर्टात शपथेवर खोटी जबानी देणाऱ्या साक्षीदाराइतकाच त्याचा अपराध मोठा म्हणावा लागेल. पण उलट खरें सांगण्याच्या बुद्धीचा विपर्यास करून एखादी व्यक्ति जर आपल्या आत्मचरित्रात सारें तारतम्य सोडून आपल्या एकूण एक खासगी गोष्टींचें किळसवाणें नग्न प्रदर्शन करील तर तेंही गर्हणीय म्हणावें लागेल. तसें प्रदर्शन करणारा लेखक आत्मचरित्र वाङ्मयाची बदनामी करणारा ठरेल."

(१) कोंदणें प्रो. ना. सी. फडके, 'आत्मचरित्रें वाचनीय केव्हा होतात?' या लेखातील उतारा.

म्हणजे मुद्दा असा की आत्मचरित्रकाराने काय सांगावें हें निश्चित केलें पाहिजे. हें निश्चित न केल्यामुळें कमळाबाई देशपांडे यांनी स्मरण साखळीत नसत्या गोष्टींना स्थान दिलें आणि म्हणूनच आत्मचरित्राचा उपयोग अशा गोष्टी सांगण्यासाठी करायला नको होता असा अभिप्राय सर्व टीकाकारांनी एकमतानें दिलेला आहे. यावरून हें स्पष्ट होतें की आत्मचरित्रकाराच्या मनांत काय सांगायचें याचें जितकें स्पष्ट चित्र असेल तितक्या त्याच्या हातून कमी चुका होतील. म्हणून काय सांगावें आणि काय सांगू नये या विषयी तारतम्य बाळगणें फार आवश्यक आहे.

ही गोष्ट आणखी एका कारणास्तव फार आवश्यक आहे. तें कारण असें की आपल्या परिचयाची अनेक माणसे असतात. याना त्या रीतीने आपला त्यांच्याशी संबंध आलेला असतो. अशावेळी आत्मचरित्रांत त्यांच्या विषयी माहिती देतांना आत्मचरित्रकाराने सावधगिरी बाळगली नाही तर त्यांच्यावर अन्याय होण्याचा फार संभव असतो. अशावेळी ती माहिती न दिलेली बरी. निदान ती देतांना आपण दुसऱ्या व्यक्तीवर अन्याय तर करीत नाही ना असें अनेकदा आपल्या स्वतःलाच विचारून पाहावें. म्हणूनच काय सांगावें याला जेवढें महत्त्व आहे तेवढेंच काय सांगू नये यालाही आहे हें आत्मचरित्रकारानें लक्षांत असू द्यावे.

८ आत्मचरित्र केव्हां लिहावें ?

आत्मचरित्रांत काय लिहावें आणि काय लिहू नये हें पाहिल्या नंतर आत्मचरित्र केव्हा लिहावें याचीही चर्चा होणें आवश्यक आहे. बहुतेक आत्मचरित्रें उतार वयांत लिहिली गेली आहेत. आणि याविषयी मतभिन्नता होण्याची शक्यताही आहे.

प्रो. ना.सी.फडके म्हणतात की (१) " म्हातारपणी करण्या सारखी जी अनेक कार्ये समजण्यात येतात त्यात परमार्थ आणि आत्मचरित्र लेखन या दोन गोष्टींचा अंतर्भाव झालेला दिसतो. इतर सारे उद्योग संपले म्हणून आत्मचरित्र लिहिण्याचा हा उद्योग केला अशी जी कबुली लेखकांच्याही ग्रंथात (गत गोष्टी) आहे ती काही फारशी प्रशंसनीय म्हणता येणार नाही. कधी कधी असेही मनात येते की वृद्धावस्थेत गेलेल्या माणसाने आत्मचरित्र लिहिण्यापेक्षा ज्याचे एक पाऊल अजून तारुण्याच्या प्रदेशात आहे त्याने ते लिहिले तर ते अधिक सरस ठरेल. वृद्धा जवळ अनुभव पुष्कळ साठलेला असतो हा एक प्रकारे मोठा गुण म्हटला तर त्या अनुभवाबद्दलच्या त्याच्या मनोवृत्तीला वयामुळे एक प्रकारचे शैथिल्य आलेले असते हा मोठा अवगुण समजावा लागेल. ज्याच्या अंगी तारुण्य अजून शिल्लक आहे अशा लेखकाच्या अनुभवाची कक्षा संकुचित असेल हे जरी खरे, तरी त्या बद्दलच्या त्याच्या मनोवृत्ती तीव्र व ताज्या असतील हे ही खरे आहे. आणि लेखनाच्या सरसतेच्या दृष्टीने या गुणाला फार मोठे महत्त्व द्यावे लागेल. Cecil Roberts - या इंग्रजी लेखकाने स्वतःचे चरित्र म्हातारपणची पहिली झुळुक लागण्याच्या आधीच लिहिले. Half Way - असे अन्वर्थक नांव त्याने आपल्या पुस्तकाला दिले आहे. Beverley Nichols या लेखकाने तर ऐन पंचविशी पुरी होताच आत्म चरित्र प्रसिद्ध केले आहे. त्याने आपल्या आत्मचरित्राचे नांव Twenty Five असे ठेवले आहे. अशात,हेच्या आत्मचरित्रापासून वाचणाराला बोध मिळणार नाही अशी कोणाची कल्पना असेल तर ती सर्वस्वी चुकीची म्हणावी लागेल. दहा वर्षाच्या एखाद्या मुलाला आपले विविध अनुभव सांगण्याची कला साध्य झालेली असली तर त्याचेसुद्धा आत्मचरित्र उद्बोधक झाल्यावाचून राहणार नाही."

दहा वर्षांचा बालकही आत्मचरित्र लिहू शकेल हा अतिशयोक्तीचा

---

(१) कोंदणें .. प्रो. ना. सी. फडके
' आत्मचरित्र वाचनीय केव्हा होतात ? ' हा लेख

भाग सोडून दिला तरी आत्मचरित्र उतारवयातच लिहावें असें समजणें चुकीचें आहे. खरे म्हणजे आपले अनुभव जर लोकांना सांगण्यासारखे आहेत आणि ते सांगण्याची आपली जर तीव्र इच्छा आहे तर असे अनुभव ऐन तारुण्यात सांगायलाही हरकत नाही. कारण अनुभवांची विस्मृती वाढत गेल्यावर आणि त्यांच्याबद्दलच्या जिव्हाळ्याला ओहोटी लागल्यावर त्या अनुभवांना सांगतांना उतारवयामुळे मनोवृत्तींना शैथिल्य आलेलें असणार हें खरोखरच मोठें वैगुण्य आहे. हेंही सर्वांस मान्य होण्यासारखे आहे. परंतु याचा अर्थ मात्र असा नव्हे की उतारवयात कोणी आत्मचरित्र लिहूच नये. कोणत्या वयांत आत्मचरित्र लिहिलें तर आत्मचरित्रकाराच्या मनोवृत्तींची तीव्रता व जोर जास्त असणें शक्य आहे, आणि त्यामुळे आत्मचरित्र कसे उठावदार होणे शक्य आहे एवढेच सांगण्याचा यातील हेतु आहे.

खरें म्हणजे आपले अनुभव सांगायची आपली तीव्र इच्छा असेल तर आपण आपलें आत्मचरित्र कोणत्याही वयांत सांगायला हरकत नाही. मराठींत जीं उत्कृष्ट आत्मचरित्रें आहेत तीं आत्मचरित्रकारांनी उतार वयातच लिहिलेलीं आहेत. केवळ उतारवयांत लिहिल्यामुळे त्यांत काही दोष आहेत असें दिसत नाही. म्हणजे आत्मचरित्र कोणत्या वयात लिहावें तर असें की जेव्हा लिहिण्याची तीव्र तळमळ असेल तेव्हा मग वय कोणतेंही असले तरी चालेल. हें मत सर्वांस मान्य होण्यासारखें आहे.

पार्वतीबाई आठवले यांनी त्यांचें आत्मचरित्र उतारवयांत लिहिलें. तरी तें त्यांनी किती समरस होऊन सांगितलें आहे हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. आपल्या इकडील स्त्री पुरुषांच्या सौंदर्य विषयक विकृत समजुतीवर त्यांनी किती झगझगीत प्रकाश टाकला आहे, तो पाहा ...

(१) " आपल्या देशात स्त्रीयांच्या सौंदर्य भावनांची वाढ जशी व्हावयास पाहिजे तशी झालेली दिसत नाही. या बाबतीत पाश्चिमात्य देशातील स्त्रियापासून आमचे स्त्रियांनी बरेच शिकण्या सारखे आहे. लग्नाच्या पहिल्या दिवशी तिकडील वधूवर आपल्या पोषाखाची व सौंदर्याची जितकी काळजी घेतात, तितकीच काळजी लग्न होऊन पाचदहा वर्षे झाली तरी घेत असतात. आपण सुंदर दिसावें, नीटनेटके असावें व आपल्या पतीचे सर्व लक्ष आपणाकडेच वेधून घ्यावें अशी महत्त्वाकांक्षा तिकडे दिसून येते. व पति देखील लग्न होण्यापूर्वी आपल्या भावी पत्नीची मनधरणी करण्याकरिता जितका प्रयत्न करील तितकाच प्रयत्न लग्न झाल्यावरही तो करण्यांत कसूर करणार नाही. याच्या अगदी उलट आमच्याकडे स्थिती आढळून येते. गृहणीचा घरातील पोषाक अगदी गबाळ्यासारखा असावयाचा. ह्या संबंधी नीटनेटके रहा असा जर उपदेश कधी करावयाचा प्रसंग आला तर आता काय पहावयास का कोणी येणार आहेत ? पहावयाचें होतें तें सर्व पाहून झालें " लग्न मुंजीकरितो व मिरवणुकीला जातांना जितकी पोषाखाची काळजी घेण्यात येते, त्याच्या शतांशानेही घरात पत्नी आपल्या पोषाकाची काळजी घेत नाहीत. ' आतां काय लग्न झालें आहे.' असे उद्गार ऐकू येतात. पत्नीने विवाहा नंतरही आपल्या सौंदर्याची व पोषाखाची काळजी घेतली, तर त्या पासून पतीला खात्रीने आनंद वाटेल. त्याचप्रमाणे पतीने पत्नीची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न विवाहानंतरही चालू ठेवला तर त्यामुळे पत्नीची प्रसन्नता अधिक वाढेल. पाश्चिमात्य देशांत ही एक कला म्हणून पतिपत्नीकडून त्याचा विकास केला जातो, व ह्यामुळे नीरस व दुःखमय संसारातही तिकडील दांपत्यास नाविन्य अनुभवावयास सापडते. इकडील पतिपत्नींनी ह्यांचें अनुकरण करण्यासारखें आहे. म्हणजे वैवाहीक आयुष्य अधिक प्रेममय व सुखावह वाटेल व त्यापासून जगांतील आनंद व सुख वाढेल."

---

(१) माझी कहाणी .. पार्वतीबाई आठवले, पृष्ठ ९८.

हा एवढा मोठा उतारा देण्याचा उद्देश असा की आत्मचरित्र लिहिण्याची तीव्र इच्छा हीच प्रमुख आहे. ही इच्छा नसेल तर ऐन तारुण्यातही आत्मचरित्र सांगितलें तरी तें चित्ताकर्षक होणार नाही. अर्थात तारुण्यातच आत्मचरित्र लिहिण्याची उत्कृष्ट इच्छा होऊन त्याप्रमाणें कोणी आत्मवृत्त लिहिलें तर तें अधिक आकर्षक होईल हें सांगायला नकोच.

तारुण्य हें वयावर अवलंबून असतें हें खरें आहे. पण तें मनाच्या उमेदीवरही अवलंबून असते, हेंही तितकेंच खरें आहे. मनाचा उत्साह, एकाद्या कार्याविषयी तळमळ, निष्ठा आणि सतत प्रयत्नांची पराकाष्ठा या गोष्टी नसतील तर ऐन पंचविशीतला तरुणही म्हाताऱ्या सारखा वागताना दिसेल. उलट चाळीशी उलटून गेलेल्या मनुष्यात वर सांगितलेले गुण असतील तर तो तारुण्याच्या उंबरठ्यावर आहे असें आपण समजतो. तद्वत् आत्मचरित्र काराजवळ आपले अनुभव सांगण्याची जबरदस्त ईच्छा असली म्हणजे मग त्याने आपलें आत्मचरित्र कुणत्याही वयात लिहिलें तरी हरकत नाही. थोडक्यात म्हणजे तीव्र इच्छा हेंच काय तें खरें कारण होय.

या प्रकरणाच्या सुरुवाती पासून तर आतां पर्यंतच्या विवेचना वरून आत्मचरित्र म्हणजे काय, आत्मचरित्रकार कां लिहितो, त्याने लिहितांना कोणत्या गोष्टी सांगाव्यात, कोणत्या सांगू नयेत, आत्मचरित्रांत सुबोध भाषेचें महत्व कसें आहे, आत्मचरित्र केव्हां लिहावें, आठवणींना आत्मचरित्रांत स्थान आहे की नाही, ----

--- कोणकोणत्या ग्रंथांचा आत्मचरित्रांत समावेश होऊं शकतो, आत्म चरित्र केव्हां लिहावें अशा अनेक प्रश्नांची आपण आतापर्यंत साधार चर्चा केली. यावरून उत्कृष्ट आत्म चरित्र कोणतें आणि निकृष्ट कोणतें हें ही आपण पाहिलें. आतां प्राचीन वाङ्मयांत चरित्र आत्मचरित्रपर कोणकोणते उल्लेख आलेले आहेत ते आपण पाहूं या.